R.N.I.No.1814/57

# नवा काळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार ३ डिसेंबर, २०२१ • वर्ष-९९, अंक-२६८, पाने-८, किंमत : ₹ ५

• Issue - 268 Vol.- 99 Marathi - Daily - Mumbai, 3 December - 2021 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

## गुजरातच्या गिर सोमनाथजवळ १५ बोटी बुडाल्या

दहा बेपत्ता


**गिर सोमनाथ -** कमी दाबाच्या पट्ट्यामुळे गुजराच्या समुद्रात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे मच्छीमारांना समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असे आवाहन सरकारने केले आहे. त्यानंतरही गिर सोमनाथ जिल्ह्याच्या नवा बंदर येथून काही मच्छीमार मासेमारीसाठी समुद्रात गेले. त्यातील १० ते १५ मच्छीमार बोटी बुडून दुर्घटना घडली. त्यापैकी ४ मच्छीमारांना वाचवण्यात यश आले असून १० मच्छीमार अद्याप बेपत्ता आहेत, अशी माहिती गिर सोमनाथच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे ३ दिवसांपासून महाराष्ट्र आणि गुजरातच्या किनारपट्टीत वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. गिर सोमनाथ जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडत आहे. त्यामुळे मच्छीमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. मात्र त्याला न जुमानता नवा बंदर येथून काही मच्छीमार बोटी मासेमारीसाठी समुद्रात गेल्या. त्यापैकी १० ते १५ बोटी बुडाल्या. या बोटींवरील मच्छीमार बेपत्ता झाले आहेत. त्यातील ४ जणांना वाचवण्यात यश आले आहे. मात्र अन्य १० मच्छीमार अद्याप बेपत्ता आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

# महाराष्ट्राच्या वेशीवर 'ओमिक्रॉन' दाखल झाला कर्नाटकात दोन रुग्ण सापडल्याने खळबळ

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, जागतिक आरोग्य परिषदेने दिलेल्या माहितीनुसार ओमिक्रॉन वेगाने पसरतो. दक्षिण आफ्रिकेतील रुग्णालये अधिकाधिक भरू लागली आहेत. मात्र हा ओमिक्रॉनचाच परिणाम आहे असे सध्या निश्चित सांगता येणार नाही. आरटीपीसीआर चाचणी आणि जिनॉम सिक्वेन्सिंग यामधून

**आज केंद्रीय आरोग्य मंत्रालयनाने ओमिक्रॉन या कोरोना विषाणुच्या नवीन रुपाच्या फैलावाबाबत बैठक घेतली. या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, कर्नाटकात 'ओमिक्रॉन' कोरोना विषाणुने ग्रस्त दोन रुग्ण आढळले आहेत. यापैकी एक ६६ वर्षांचा आणि दुसरा रुग्ण ४६ वर्षांचा आहे. याचाच अर्थ ओमिक्रॉन आता महाराष्ट्राच्या वेशीपर्यंत आला आहे.**



ओमिक्रॉनची बाधा झाली आहे की नाही हे कळू शकते. त्यामुळे चाचण्यांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. सध्या या प्रसाराला आळा घालण्यासाठी मास्क घाला, अंतर ठेवा, हात धुवा, बंदिस्त ठिकाणे टाळा, गर्दीची ठिकाणे टाळा हे आवश्यक आहे.

केंद्र सरकारने आफ्रिका व इतर १२ राज्यांतून विमानाने येणाऱ्या प्रवाशांवर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. या प्रवासावर बंदी घातलेली नाही. प्रवाशांवर विलगीकरणाची सक्तीही केलेली नाही. मात्र महाराष्ट्राने ३ देशातून येणाऱ्या प्रवाशांची चाचणी आणि बाधा आढळल्यास ७ दिवस विलगीकरणाचा निर्णय घेतला आहे. दिल्लीच्या केजरीवाल सरकारने विमान वाहतूक बंद करण्याची मागणी केली आहे. यामुळे पुन्हा एकदा केंद्र सरकार आणि बिगर भाजपा राज्य सरकार यांच्यात मतभेद निर्माण झाला आहे.

## परमबीर सिंह अखेर पोलीस सेवेतून निलंबित

**पोलीस सेवेत असूनही खंडणीच्या प्रकरणात एखाद्या फरारी झालेले आणि संपती जप्त करण्याच्या न्यायालयाच्या आदेशानंतर हजर झालेले मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना अखेर आज पोलीस सेवेतून निलंबित करण्यात आले. बेशिस्त वर्तणूक आणि अनियमितता असा ठपका ठेवून तयार करण्यात आलेल्या त्यांच्या विरुद्धच्या फाईलवर आजच मुख्यमंत्र्यांनी सही केली आणि आजच त्याबाबतचा आदेश दिला.**

■ मुंबई



**सध्या** राज्याचे मुख्य सचिव असलेले देवाशिष चक्रवर्ती यांनी परमबीर सिंह यांच्यासंबंधी तयार केलेला अहवाल महाराष्ट्र सरकारने स्वीकारला आहे. परमबीर सिंह यांनी नागरी सेवांचे उल्लंघन केल्याने देवाशिष चक्रवर्ती यांनी त्यांची चौकशी केली होती. याशिवाय प्रशासकीय त्रुटींसाठी पान ७ वर

## अवकाळी पावसाचे दोन बळी! शेतकरी पुन्हा संकटात अंजिरात पाणी, मोहोर गळाला, कांदा पडला, द्राक्ष किडली

■ मुंबई

**राज्यात** अवकाळी पावसामुळे हवेत आलेल्या गारठ्याने शिर्डीत दोन कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर राज्यात विविध ठिकाणी शेकडो शेळ्या - मेंढ्याचाही थंडीमुळे मृत्यू झाला आहे. हंगामी पीक घेणारे शेतकरी, फळबाग शेतकरी ,पशुपालकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अलिबागला कलिंगड पीक खराब झाले आहे. कोकणात आंब्याच्या झाडांचा मोहोर गळाला आहे. पुणे जिल्ह्यात अंजिरात पाणी शिरले आहे. सांगोल्यात मक्याची कणसे पाण्यात सडली आहेत. नाशिकला कांद्याचा भाव पडला आणि तासगावला द्राक्षाचे पीक हातून गेले आहे. तर कोल्हापुरात उसाला फटका बसला आहे. कराडला ज्वारी पिकाचेही नुकसान झाले आहे.

पावसामुळे भाईन्दरच्या उत्तन बोटींनी दाभोळला आश्रय घेतला आणि रत्नागिरी जिल्ह्यातील बोटींनीही दाभोळ व जयगड बंदरात आश्रय घेतला आहे. राज्यात पान ७ वर

### आंध्र प्रदेश-ओडीशावर आज चक्रीवादळ धडकणार

शनिवार ४ डिसेंबर रोजी आंध्र प्रदेश आणि ओडीशाला जवाद चक्रीवादळ धडकणार आहे. दक्षिण अंदमान समुद्रातील कमी दाबाच्या पट्ट्याचे या वादळात रूपांतर होणार आहे. यामुळे दोन्ही राज्यात तुफान पाऊस कोसळणार आहे. दोन्ही राज्यांनी या संकटाचा सामना करण्याची तयारी केली असून पंतप्रधान मोदी यांनीही याबाबत आढावा बैठक घेतली.

## वेंगुर्ल्यातील रेडी खाण प्रकल्पाविरोधात गावकरी! जनसुनावणीत आक्षेप नोंदवला

■ मुंबई

**वेंगुर्ल्यातील** रेडी गावात ४० वर्षांहून अधिक काळ सुमारे २६० एकर पेक्षा जास्त जमिनीत मायनिंग केले जात आहे.आता भर लोकवस्तीत मायनिंग प्रकल्प उतरू लागले आहेत. रेडीतील सुमारे ६८ एकर जमीन ही नवीन मायनिंग प्रकल्पाचा ना हरकत दाखला मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या प्रकल्पाला पर्यावरण प्रेमी संघटना आणि गावकऱ्यांनी विरोध केला आहे. मायनिंगवाले रेडीतील पठार, समुद्र किनारे उद्ध्वस्त करून आता उरलीसुरली लोकवस्ती व शेती -बागायती उजाड करू पाहत असल्याचा आरोप रेडीवासियांनी केला आहे. आज याबाबतची जनसुनावणी रेडीमध्ये झाली. या सुनावणीत गावकऱ्यांनी आपला आक्षेप नोंदवून मायनिंग बंद करण्याची मागणी केली. सेव कोकण मुव्हमेंट कार्यकर्ते सत्यजित चव्हाण यांना याबाबत माहिती देताना सांगितले की, वेंगुर्ल्यातील रेडी या सागरकिनारी असणाऱ्या गावात गेल्या ४० वर्षांपूर्वीपासून पान ७ वर




**भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या सर्व सन्माननीय पॉलिसी धारकांसाठी जाहीर सूचना. भारताबाहेरील कोणत्याही पत्त्यावर वितरणासाठी नाही.**

1. विविध प्रेस रिपोर्ट्सवरून तुमच्या लक्षात आले असेल की भारत सरकार भारतीय जीवन विमा महामंडळाच्या (''**एलआयसी**'' किंवा ''**महामंडळ**'') समभागांचे जाहीर वितरण करण्यासाठी आणि भारतीय स्टॉक एक्स्चेंजेसवर हे समभाग सूचीबद्ध करण्यासाठी अत्यंत उत्सुक व इच्छुक आहे.
2. आतापर्यंत तुम्हाला माहित झाले असेल त्यानुसार भारत सरकारने एलआयसीच्या पॉलिसीधारकांच्या हिताच्या दृष्टीने, फायनान्स अॅक्ट, 2021 चे कलम 131 प्रारंभ झाल्याच्या पाच वर्षाच्या कालावधी दरम्यान म्हणजेच 30 जून 2021 पासूनची 5 वर्षे, कॉर्पोरेशन भविष्यकाळात अंमलात आणू शकेल अशा कोणत्याही जाहीर सादरीकरणामध्ये कॉर्पोरेशनला एक राखीव गट म्हणून, पॉलिसीधारकांच्या नावे स्पर्धात्मक पद्धतीने, आवश्यक त्या मंजुरी मिळण्याच्या अधीन, आरक्षण देता यावे यादृष्टीने एलआयसी कायदा 1956 मध्ये एक दुरूस्ती मंजूर केली आहे.
3. अशा कोणत्याही जाहीर सादरीकरणामध्ये (पब्लिक ऑफरींग) सहभागी होण्यासाठी पॉलिसी धारकांनी त्यांच्या पॅनची माहिती महामंडळाच्या नोंदींमध्ये अद्ययावत केली गेली असल्याची खात्री करून घेणे गरजेचे आहे. याशिवाय, भारतातील कोणत्याही पब्लिक ऑफरींगमध्ये सहभागी होणे हे तेव्हाच शक्य होते, जेव्हा तुमच्याकडे एक वैध डिमॅट खाते असते – त्यामुळे पॉलिसीधारकांनी खात्री करून घ्यावी की त्यांचे डिमॅट खाते सक्रीय स्थितीत आहे.
4. पॉलिसीधारकांच्या हिताच्या दृष्टीने आमच्या नोंदींमध्ये तुमच्या पॅनची माहिती अद्ययावत करण्याची विनंती करणाऱ्या जाहिराती आम्ही प्रसारीत करीत आलो आहोत. जर तुम्ही अद्यापही महामंडळाला ही माहिती दिली नसेल, तर कृपया लवकरात लवकर तसे करा. ही बाब केवायसीच्या दृष्टीने, तसेच एलआयसी कडून पब्लिक ऑफरींग्स जाहीर करण्यात आल्यास, अशा पब्लिक ऑफरींग्स आवश्यक त्या नियामक व इतर अनेक प्रकारच्या मंजुरी मिळण्याच्या अधीन, जेव्हा कधी जाहीर करण्यात येतील, तेव्हा प्रस्तावित पब्लिक ऑफरींग मध्ये सहभागी होण्याच्या तुमच्या पात्रतेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. ही गोष्ट तुम्हाला प्रस्तावित ऑफरींग्समध्ये सहभागी होण्यास मदत करण्यासाठी उपयोगी येईल.
5. महामंडळाकडे तुमच्या पॅनची माहिती अद्ययावत करण्याची पद्धती खाली नमूद करण्यात येत आहे:
   - 5.1 तुम्ही महामंडळाची वेबसाईट www.licindia.in किंवा https://licindia.in/Home/Online-PAN-Registration वर व्हिजिट करा. तुमचा पॅन अद्ययावत करताना आवश्यक असणारी तुमचा पॉलिसी क्रमांक, पॅन, जन्मतारीख आणि इ-मेल आयडी सारखी माहिती हाताशी तयार ठेवा.
   - 5.2 वरील लिंकचा वापर करून तुम्ही तुमच्या सर्व एलआयसी पॉलिसीवरील नोंदी अद्ययावत करू शकता.
   - 5.3 याशिवाय महामंडळाची वेबसाईट www.licindia.in किंवा https://linkpan.licindia.in/UIDSeedingWebApp/getPolicyPanStatus? वर व्हिजिट करून तुमच्या पॉलिसीवर तुमच्या पॅनची नोंदणी झाली आहे किंवा नाही हे देखील तुम्ही तपासून पाहू शकता.
   - 5.4 याखेरीज मदत मिळविण्यासाठी तुम्ही तुमच्या एलआसयी एजंट बरोबर संपर्क साधू शकता.
   - 5.5 जर तुम्हाला अद्याप पॅन देण्यात आलेला नसेल, तर आम्ही सुचवितो की तुम्ही शक्य तितक्या लवकर त्यासाठी अर्ज करावा. तुम्ही पॅनसाठी अर्ज करू शकता, ज्याची प्रक्रिया https://www.incometaxindia.gov.in/Pages/tax-services/apply-for-pan.aspx–येथे देण्यात आली आहे. एकदा तुम्हाला पॅन मिळाला की महामंडळाच्या तुमच्या रेकॉर्डसमध्ये पॅन अद्ययावत करण्यात कृपया विसरू नका.
   - 5.6 डिमॅट खात्यांच्या संबंधात जर तुमच्याकडे सध्या वैध डिमॅट खाते नसेल, तर तुम्ही तुमच्या स्वत:च्या अधिकारात, आणि असल्यास, तुमच्या स्वत:च्या खर्चाने पुढील पावले उचलण्याचा विचार करू शकता: तुमच्या फायद्याच्या दृष्टीने डिमॅट खाते उघडण्याबाबत तुम्हाला मदत करू शकेल अशा डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट (डिपी) बरोबर संपर्क साधा. डिमॅट खाते उघडण्यासाठी योग्य त्या डिपीची निवड करण्यासाठी तुम्ही खालील लिंक पाहू शकता –
     - (i) एनएसडीएलकडे नोंदणी असणारे डिपी – https://sebi.gov.in/sebiweb/other/OtherAction.do?doRecognisedFpi=yes&intmId=19
     - (ii) सीडीएसएलकडे नोंदणी असणारे डिपी – https://sebi.gov.in/sebiweb/other/OtherAction.do?doRecognisedFpi=yes&intmId=18
     - (iii) जर तुमच्या केवायसीची केआरए (केवायसी रजिस्ट्रेशन एजन्सी) कडून पडताळणी झाली नसेल, तर डिमॅट खाते उघडण्यासाठी तुम्ही पुढील महत्त्वाचे दस्तऐवज डिपीकडे पुरविण्याची आवश्यकता आहे:
       - अलिकडचे छायाचित्र • पॅनकार्ड
       - पत्त्याचा पुरावा • रद्द केलेला धनादेश
     - (iv) संबंधित डिपी, त्यांच्या अंतर्गत आवश्यकतांच्या अनुसार संबंधित अधिक दस्तऐवजांची देखील मागणी करू शकतात.
     - (v) जर तुम्हाला अधिक मदत हवी असेल तर कृपया तुम्ही या संदर्भात तुमचे बँकर किंवा ब्रोकर यांच्याशी संपर्क करण्याचा विचार करू शकता.
6. **आम्ही पुन्हा एकदा अधोरेखित करतो की ही सूचना अथवा आमच्या पॉलिसी धारकांना सांगितली जात असणारी कोणतीही माहिती ही महामंडळाचे समभाग देऊ करण्याची सूचना नाही आणि युनायटेड स्टेट्समध्ये समभागांची कोणतीही पब्लिक ऑफरींग नसेल. याशिवाय डिपॉझिटरी पार्टीसिपन्टकडे तुम्हाला स्वत:ला जावे लागेल आणि तुमचे डिमॅट खाते व त्यातील कामकाज यासाठी संपूर्णत: तुम्हीच जबाबदार असाल.**
7. हा पत्रव्यवहार म्हणजे पब्लिक ऑफरींग (जाहीर वितरण) अथवा अन्य कोणत्याही मार्गाने महामंडळाच्या समभागांमध्ये पैसे भरण्यासाठी कोणत्याही प्रकारची ऑफर अथवा आमंत्रण नाही. अशा प्रकारच्या प्रस्तावित ऑफरच्या कालमर्यादा आणि (पॉलिसीधारकांसाठी स्पर्धात्मक तत्त्वावर कोणत्याही प्रकारचा राखीव कोटा असेल काय, याच्या समावेशासह) माहिती सध्या अज्ञात आहे. याच्या रचनेला भागधारक आणि महामंडळ यांच्याकडून अद्याप मंजुरी देखील मिळालेली नाही. अशा प्रकारच्या पब्लिक ऑफरींगमध्ये पॉलिसी धारकांसाठी आरक्षण ठेवण्यात आले तर, प्रस्तावित ऑफरींगमध्ये त्यांनी अर्ज केलेले सर्व अथवा कोणतेही समभाग पॉलिसीधारकांना वाटप करण्यात येतील याविषयी कोणत्याही प्रकारची खात्री देता येत नाही, कारण आशा प्रकारचे आरक्षण स्पर्धात्मक तत्त्वावर असेल. सदर महामंडळ आपल्या समभागांच्या कामगिरीविषयी कोणतीही हमी देत नाही आणि कोणत्याही प्रस्तावित ऑफरींग मध्ये अर्ज करण्याऱ्या सर्व व्यक्तींना समभागामधील गुंतवणूक आणि त्यातून निर्माण होणारी अस्थिरता यांच्याशी संबंधित जोखमींची जाणीव असणे गरजेचे आहे.

**तुम्हाला डिमॅट खाते उघडणे आणि/किंवा पॅन दिला जाणे व डिमॅट खाते चालू ठेवणे अथवा इतर संलग्न भार यांच्यासाठी खर्च द्यावा लागेल. अशा प्रकारचे सर्व खर्च संपूर्णत: तुम्हाला सहन करावे लागतील. याबाबतचे कोणतेही खर्च महामंडळ करणार नाही.**

कोणत्याही कायदेशीर बाबींच्या संदर्भात या सूचनेचे इंग्रजी रूपांतर ग्राह्य असेल.

शुभेच्छा,
टिम एलआयसी

LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

IRDAI Regn No.: 512

प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

# पुण्यातील मेट्रोच्या कामकाजाला दोन वर्षाचा कालावधी लागणार

## पुणे मेट्रोला ७० कोटी रुपयांचा भुर्दंड



■ पुणे, प्रतिनिधी

**गणेश** विसर्जन मिरवणुकीसाठी संभाजी पुलावरून क्रॉस होणाऱ्या मेट्रोचा ट्रॅक फोल्डिंगचा करायचा झाल्यास सध्या उभारलेले मेट्रोचे ३९ पिलर्स हटवावे लागणार आहेत. हे पिलर हटवणे आणि नवीन उभारण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागणार असून सुमारे ७० कोटी रुपयांचा खर्च वाढणार असल्याचा अहवाल महा मेट्रोने दिला आहे. त्यामुळे या फोल्डींग मेट्रो पूल किंवा पुलाची उंची वाढवण्याचा आग्रह सोडून द्यावा अशी विनंती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी केली आहे. गणेशोत्सवामध्ये विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या मंडळांच्या देखाव्यांना संभाजी पुलावरून जवळपास २२ फूट उंचीवरून जाणाऱ्या मेट्रो मार्गिका अडचणीची ठरणार अशी भूमिका काही मंडळांनी घेतली आहे. त्यामुळे मेट्रोचे कामकाज ३ महिन्यांपासून बंद आहे.

दरम्यान महापौर मुरलीधर मोहोळ, गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, वाहतूक पोलिसांची संयुक्त बैठक घेण्यात आली . यामध्ये काँग्रेसचे गटनेते आबा बागुल आणि काही मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी फोल्डिंगचा मेट्रो उड्डाण पूल करावा असा आग्रह धरला होता . अखेर महापौर मुरलीधर मोहोळ यांनी मेट्रोच्या अधिकाऱ्यांना या संदर्भात अहवाल तयार करण्याच्या सूचना दिल्या होत्या . याबाबत महा मेट्रोने हा अहवाल सादर केला आहे. यासोबतच कामात झालेल्या बदलांसाठी विविध विभागांच्या नव्याने परवाणग्या तसेच अन्य तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागणार असे या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

यासंदर्भात गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी ही पुणेकरांना सार्वजनिक वाहतूक सेवा लवकरात लवकर उपलब्ध व्हावी यासाठी ही मागणी मागे घ्यावी. तसेच गणेशोत्सव काळात पुलाच्या उंची नुसारच रथाची उंची गणेश मंडळांनी ठरवावी अशी विनंती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी केली असून तीन महिन्यांपासून खोळंबलेल्या या कामाला पुन्हा सुरू करण्यासाठी लवकरात लवकर हिरवा कंदील मिळावा यासाठी महापौर प्रयत्नशील आहेत.

# आंबोली घाटात वाहतूक सुरूच

**सिंधुदुर्ग-** जीर्ण होत असलेल्या आंबोली घाटात गेल्या चार पाच वर्षात दरड कोसळणे,घाट खचत चालणे प्रकार वाढले असून त्यामुळे कंटेनर सारखी अवजड वाहनांना या घाटात प्रवेश बंद करण्यात आला आहे. यासाठी प्रारंभी बावळाट तिठ्यावर पोलीस तैनात करण्यात आला होता. आंबोली घाटात मात्र अवजड वाहतूक सुरूच आहे. ज्या कारणांसाठी बावळाट तिठा येथे पोलीस तैनात करण्यात आला होता. ते कारण बाजूलाच राहिले उलट तिथे एकापेक्षा चार पाच पोलीस बसू लागले असून अनधिकृत लाठी निर्माण केली आहे. आंबोलीत नाका असतानाही आर्थिक फायद्यासाठी बावळाट तिठा येथे पोलीस उभे असल्याचे चित्र उभे राहिले असून त्याचा पुरावा आज दिसून आला. दाणोलीत कंटेनर पलटी झाल्याने पोलिसांचा कारनामा उघड झाला आहे.

# सहज हॅक होणाऱ्या २०० पासवर्डची यादी जाहीर! तुमचा पासवर्ड यात नाही ना?

**वीज बिल, फोन बिल भरण्यापासून ते अगदी कपडे आणि जेवण ऑर्डर करण्यापर्यंत आज अनेक व्यवहार ऑनलाइन केले जाऊ लागले आहेत. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले, अनेक कामे सोपी झाली हे खरे असले तरी सायबर सुरक्षा हा अतिशय जिकिरीचा मुद्दा बनला आहे. पैशाचा किंवा वैयक्तिक माहितीचा हॅकर्सकडून कोणत्याही प्रकारे गैरवापर होऊ नये, यासाठी आपले पासवर्ड सुरक्षित ठेवणे ही आपली जबाबदारी बनली आहे. परंतु जगभरात असे अनेक लोक आहेत ज्यांचे पासवर्ड हॅकर्स काही सेकंदात क्रॅक करू शकतात, यात भारताचाही समावेश आहे. 'नॉर्डपास-पासवर्ड मॅनेजमेंट सर्व्हिस' दरवर्षी जगभरात सर्वाधिक वापरल्या गेलेल्या आणि क्रॅक करायला सोप्या असणाऱ्या पासवर्डची यादी जाहीर करते. यंदाच्या अहवालातही त्यांनी अशा २०० पासवर्डची यादी जाहीर केली आहे. '१२३४५६' हा जगभरात सर्वाधिक वापरला जाणारा पासवर्ड असल्याचे त्यांनी या अहवालात जाहीर केले आहे.**

**नॉर्डपास** दरवर्षी हा अहवाल प्रसिद्ध करते. सायबर तज्ज्ञांकडून जगभरातील ५० देशांमधील डेटाबेसचा अभ्यास करून या अहवालासाठी माहिती संकलित केली जाते. प्रत्येक देशातील माहितीचे संकलन करून, वर्गीकरण करून त्याचे सांख्यिकीय विश्लेषण केल्यानंतर ही यादी प्रसिद्ध होते. २०२१ च्या अहवालासाठीदेखील त्यांनी ५० देशांमधील माहितीच्या आधारे सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या २०० पासवर्डची यादी काढली आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर असणारा आणि जगभरात सर्वाधिक वापरण्यात येणारा पासवर्ड हॅकरला एका सेकंदात क्रॅक करता येऊ शकतो अशी धक्कादायक माहितीही समोर आली आहे.

### सुरक्षित पासवर्ड तयार करण्यासाठी टिप्स...

- पासवर्ड किमान ०८ ते १५ अक्षरांचा असावा.
- यात अक्षरांसह अंकांचाही समावेश असावा
- पासवर्डमध्ये एक तरी अक्षर इंग्रजीतील 'कॅपिटल लेटर' असावे
- पासवर्डमध्ये स्पेशल कॅरॅक्टर्सचा (@,#,%,&,*) वापर करावा.
- ठराविक कालावधीनंतर पासवर्ड बदलत रहावा.
- पासवर्डमध्ये तुमचे नाव, जन्मतारीख याचा वापर टाळावा.
- एकच पासवर्ड सगळ्या अकाऊंटसाठी वापरणे टाळावे.
- पासवर्ड कोणालाही सांगू नये.




**जगभरात सर्वाधिक वापरले जाणारे पासवर्ड-**

५० पैकी ४३ देशांमध्ये सर्वाधिक वापरला जाणारा पासवर्ड "123456' हा आहे. त्यानंतर 1234567890, qwerty123, 000000, aa12345678, password1, 123321, 7777777, ,11111, मंकी, फुटबॉल, प्रिन्सेस, टार्गेट१२३ असे काही पासवर्ड वारंवार वापरण्यात आल्याचे दिसते. हे पासवर्ड क्रॅक करायला एखाद्या हॅकरला ४ सेकंद ते ३ मिनिटांपर्यंचा वेळ लागू शकतो.

**भारतात सर्वाधिक वापरले जाणारे पासवर्ड-**

या यादीमध्ये भारतात वापरल्या जाणाऱ्या 'कॉमन पासवर्ड'ची यादीही प्रसिद्ध करण्यात आली आहे. भारतात सर्वाधिक वापरला जाणारा, प्रथम क्रमांकावरील पासवर्ड हा "password' शब्दच असल्याचे या यादीत नमूद करण्यात आले आहे. '123456' हा जगभरात सर्वाधिक वापरला जाणारा पासवर्ड भारतातही दुसऱ्या क्रमांकावर आहे. यानंतर भारतात वापरल्या जाणाऱ्या पासवर्डमध्ये 2345, 12345678, 123456789, india123, 123456789, 123567आणि qwerty यांचा समावेश आहे. आयलव्हयू, वेलकम, वेलकम१२३, इंडियन, कॉम्युटर, मुंबई, चेन्नई असे पासवर्डही वापरण्यात येतात. त्याचप्रमाणे - पूजा, प्रियांका, राजेश, अंजली, सुरेश, प्रकाश, खुशी, संतोष, गौरव, प्रशांत, सुरेखा, सोनाली अशी काही भारतीय नावेदेखील पासवर्ड म्हणून वारंवार वापरण्यात आल्याचे या अभ्यासात जाहीर करण्यात आले आहे.

भारतातील पासवर्डच्या यादीमध्ये मोठ्या प्रमाणात देवी-देवतांची नावे पासवर्ड म्हणून ठेवण्याचा ट्रेंडही या यादीत दिसून आला. ओम साईराम, साईराम, हरीओम, जय श्रीकृष्णा, जय मातादी, लक्ष्मी, श्रीराम, स्वामी समर्थ, बिसमिल्लाह असे अनेक पासवर्ड भारतात वापरले जातात जे एखाद्या हॅकरला क्रॅक करायला २ ते ३ मिनिटांचा वेळ लागू शकतो.

# शुभम आवारी यांचा सैन्य दलात अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल राज्य पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

■ अहमदनगर, प्रतिनिधी



**अहमदनगर** जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील धामणगाव आवारी गावचे भुमीपुत्र शुभम युवराज आवारी यांची भारतीय सैन्य दलामध्ये लेफ्टनंट इंडीयन आर्मी वर्ग एक अधिकारी पदी भारत सरकार येथे निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा शाल पुष्पगुच्छ सन्मानपत्र देऊन त्यांच्या निवासस्थानी विशेष सत्कार करण्यात आला होता तर यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वास आरोटे तालुकाध्यक्ष अशोक उगले समवेत त्यांचे वडील डॉक्टर युवराज आवारी, मातोश्री सौ. आवारी, आजोबा लहू तिकोने आदि उपस्थित होते तर युवराज आवारी यांची भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट (वर्ग १) अधिकारी पदी नियुक्त झाल्याने त्याने अकोले तालुक्याची मान उंचावली आहे. शुभम याचे वडील हे तालुक्यातील सहकार क्षेत्रातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या अमृतसागर दूध संघाचे पशुसंवर्धन अधिकारी या पदावर काम करत असताना जिद्द व चिकाटीच्या जोरावर शुभमने मात्र आपल्या गावचे व घराण्याचे नाव देशपातळीवर चमकावले आहे. त्याचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घेतला तर नक्कीच जिद्द व चिकाटीच्या जोरावर आपण यशस्वी वाटचाल करू शकतो आपल्या आईवडिलांचे असलेले स्वप्न त्याने अखेर पूर्ण केले. शुभम आवारी याने ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी चेन्नई येथे नियुक्तीपूर्व प्रशिक्षण पूर्ण केले. मद्रास युनिव्हर्सिटी तर्फे पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा इन डिफेन्स अँड स्ट्रटिजिक स्टडीज ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्याचे प्राथमिक शिक्षण जि. प. शाळा ब्राह्मणवाडा व माध्यमिक शिक्षण सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडा. जवाहर नवोदय विद्यालय अहमदनगर, बारावीचे शिक्षण महाराष्ट्र शासन संचलित सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था औरंगाबाद येथे पूर्ण केले. पदवीचे शिक्षण कॉलेज पुणे येथे पूर्ण केले. तर केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या सीडीएसई कम्बाईन डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन मध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर संरक्षण मंत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या भारतातील सर्वात कठीण मुलाखत सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड या पाच दिवसीय मुलाखतीमध्ये पात्र होऊन गुणवत्ता यादीत देशात ४६ वा क्रमांक संपादन केला.

# सातारा जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे ओला दुष्काळ सदृश्य स्थिती

■ सातारा, प्रतिनिधी

**आग्नेय** अरबी समुद्र व लगतच्या बेट समूहात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने दोन दिवस ढगाळ वातावरण व पावसाने अतोनात नुकसान झाले आहे. सातारा जिल्ह्यात अवकाळी पावसाचा फटका मोठ्या प्रमाणात शेतीला बसला आहे. ओला दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे.

रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा तसेच जावळी-महाबळेश्वर पाचगणी परिसरात स्ट्रॉबेरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गेली दोन वर्षांपासून नैसर्गिक बदलाने शेतीचे नुकसानच होत आहे. शेती पीक विमा कंपन्या कडून नुकसानभरपाई मिळत नाही, जिल्हा बँक त्याकडे लक्ष देत नाहीत. आता तर संचालक मंडळाच्या निवडणुकीकडे सर्व पक्षीय नेत्यांनी वाहून घेतल्याने शेतकऱ्यांकडे पाहण्यास वेळ नाही, अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडी कडे त्यांचे लक्ष लागले आहे. अशी टीका होत आहे. तर अद्याप ही महसूल विभागाने पंचनामे करण्यास सुरुवात केली नाही.

### दोन वर्षांपासून नैसर्गिक बदलाने शेतीचे नुकसानच

महाबळेश्वर, पाचगणी, दांडेघर, भिलार, भोसे, मेटगुताड, जावळीतील सायघर, कावडी, राणगेघर, काटवली, सोमर्डी, हुमगाव,करहर परिसरात स्ट्रॉबेरीची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे. ही स्ट्रॉबेरी पावसाने वाया जाण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शेतकरी हवालदिल झाले आहेत. सुमारे साडे चारशे हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. सातारा जिल्ह्यात कराड, सातारा, पाटण, खटाव, खंडाळा, माण, कोरेगाव, फलटण, वाई, जावळी तालुक्यातील क्षेत्रात गहू, हरभरा, ज्वारी या पिकांना ही अवकाळी पावसामुळे चांगलाच फटका बसला आहे. शेतात भात खाचरा सारखे पाणी साचून राहिले आहे, दोन दिवसात कडक उन्ह पडले तर काही प्रमाणात पिकांना जीवदान मिळणार आहे. अन्यथा शेतकऱ्यांना पुन्हा नैसर्गिक संकटाने आर्थिक झळ सोसावी लागणार आहे, काहींनी नुकतेच भागलंण केले होते, त्यांना आता चिंता लागली आहे.

# बूस्टर डोसला परवानगी द्या सीरमचा डीसीजीआयकडे प्रस्ताव

■ पुणे

**कोरोनाच्या** नवा प्रकारामुळे आता राज्यांसह देशपातळीवरील आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली असताना आता कोरोनाची लस निर्मिती करणाऱ्या सीरम इन्स्टिटय़ूट ऑफ इंडियाने कोविशिल्डला बूस्टर डोसच्या रुपात मंजुरी द्यावी, असा प्रस्ताव केंद्र सरकारच्या ड्रग्स कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाकडे (डीसीजीआय) पाठवला आहे.




सीरमच्या एक संचालक प्रकाशकुमार सिंह म्हणाले की, भारताचे औषध महानियंत्रक यांच्याकडे कोव्हिशील्डच्या बूस्टर डोससाठी परवानगी मागणारा अर्ज आम्ही केला आहे. ब्रिटनमध्ये अशी परवानगी आधीच देण्यात आलेली आहे, असे आम्ही यात निदर्शनास आणून दिले आहे. बूस्टर डोस ही काळाची गरज आहे आणि प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याच्या अधिकारांचाही प्रश्न आहे. या महामारीत स्वत:चा बचाव करण्यासाठी बूस्टर डोसची मागणी होत असेल तर तो दिला गेला गेला पाहिजे. त्यापासून कुणी वंचित राहू नये, असेही सिंह यांनी सांगितले.

# सरकारी नोकरी नाही,पेपर फुटतो कुठल्यातरी घोटाळ्यात रद्द होतो

## तरुणांनी कधीपर्यंत धीर धरायचा? वरुण गांधींचे केंद्रावरच टीकास्त्र

■ नवी दिल्ली

**कोरोनामुळे** महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये परीक्षा, त्यांचे निकाल, सरकारी नोकऱ्या यात गोंधळ, अर्धे अधिक घोटाळे झाले असल्याच्या अनेक घटना समोर आल्याअसताना सध्या यूपीमध्ये स्पर्धा परीक्षांच्या निकालांना होणारा विलंब, परीक्षेपूर्वी होणारी पेपरफुटी यासारख्या प्रकरणांना आता राजकीय वर्तुळात आवाज उठवला जात आहे. यावरुन आता पीलीभीतचे भाजप खासदार वरुण गांधी यांनी पुन्हा एकदा आपल्याच सरकारवर टीका केली आहे.

नुकत्याच झालेल्या हरियाणातील हत्याकांडानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्याने केंद्र सरकारला घेरणाऱ्या वरुण गांधींनी यावेळी नोकरी आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावरून निशाणा साधला आहे. वरूण गांधी यांनी ट्विट केले की, 'आधी सरकारी नोकरी नाही, तरीही काही संधी आली तर पेपर फुटतो, परीक्षा दिली तर वर्षानुवर्षे निकाल लागत नाही, मग कुठल्यातरी घोटाळ्यात तो रद्द होतो. रेल्वे ग्रुप डी मधील १.२५ कोटी तरुण दोन वर्षांपासून निकालाची वाट पाहत आहेत. सैन्यात भरतीबाबतही हीच स्थिती आहे.

भारतातील तरुणांनी कधीपर्यंत धीर धरायचा?' असा प्रश्न करत वरुण गांधी यांनी सरकारवर टीका केली आहे. अलीकडेच उत्तर प्रदेशात यूपीटीईटी परीक्षेचा पेपर फुटला होता. याबाबत वरुण गांधी यांनी ट्विट केले होते की, परीक्षेचा पेपर फुटल्याने लाखो तरुणांच्या भवितव्याशी खेळ होत आहे. या दलदलीतील लहान माशांवर कारवाई करुन चालणार नाही, त्यांचा राजकीय पोशिंदा असलेल्या शिक्षण माफियांवर सरकारने कडक कारवाई करावी.' 'बहुतांश शैक्षणिक संस्था या राजकीय नेत्यांच्या मालकीच्या असल्याने त्यांच्यावर कारवाई कधी होणार? या प्रकरणी अशांच्या हाताखाली काम करणाऱ्यावर कारवाई व्हायला हवी. यांना अटक करण्याऐवजी याचे सूत्रधार शोधून काढले पाहिजे. अशा शैक्षणिक संस्था चालवणाऱ्या माफियांवर कारवाई व्हायला हवी', अशी मागणी त्यांनी केली होती.

# ठाणे जिल्ह्याचे नेते बाळ्या मामांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

**ठाणे-** ठाणे जिल्ह्याचे लोकनेते तथा ठाणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम व आरोग्य समितीचे माजी सभापती आदरणीय सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी आज राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, मंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात झालेल्या जाहीर कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

# बिबट्याने केलेल्या हल्ल्यात गायीच्या वासराचा मृत्यू

**वेंगुर्ला, प्रतिनिधी-** वेंगुर्ले तालुक्यातील किनळणेवाडी येथील शेतकरी सुहास सहदेव तो यांच्या गोठयातील गायीच्या ४ वर्षांच्या वासरावर मंगळवारी मध्यरात्रीच्या १ च्या सुमारास बिबट्याने हल्ला केल्याने गायीचे वासरू मृत्युमुखी पडल्याची घटना घडली आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत सुहास तोरसकर यांनी बुधवारी सकाळी वनविभागाला माहिती दिल्याने मठ वनपाल अण्णा चव्हाण, मठ वनरक्षक सूर्यकांत सावंत यांनी पंचनामा केला आहे. संबंधित शेतकऱ्याचे नुकसान झाले असून त्वरित नुकसानभरपाई मिळावी,अशी मागणी करण्यात आली आहे.

# काळाचौकीतील बालिकेच्या चोरीचा बनाव मुलगी नको म्हणून आईने घेतला जीव

■ मुंबई

**काळाचौकी** येथील फेरबंदर परिसरातून दोन दिवसांपूर्वी ३ महिन्यांची मुलगी बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र, या प्रकरणाचा छडा लागला असून जन्मदात्या आईनेच हत्या केल्याचे उघड झाले आहे. मुलगी नको म्हणून तिने हा बनाव रचला होता. अखेर पोलिसांनी त्यांचा खाक्या दाखवताच आईने मुलीची हत्या केल्याचे समोर आले आहे. धक्कादायक म्हणजे हत्या करून चिमुकलीचा मृतदेह तिने पाण्याच्या टाकीत ठेवला होता.

३० नोव्हेंबर रोजी फेरबंदर येथील संघर्ष सदन या इमारतीत तीन महिने १५ दिवसांची मुलगी चोरीला गेल्याचे समोर आले होते. सपना यांनी दिलेल्या माहितीनुसार ३० नोव्हेंबरला त्या घरी एकट्याच होत्या. त्यावेळी दुपारी १२ ते १ च्या सुमारास एक ३० ते ३५ वर्षाची महिला आली. जुन्या मोबाईलच्या बदल्यात नवीन भांडी देण्याचं सांगून आरोपी महिलेने सपना मगदूम यांचा विश्वास संपादन केला.


सपना मगदूम यांची तीन महिने पंधरा दिवसांची मुलगी वेदा ही पलंगावर झोपली होती. आरोपी महिलेला देण्यासाठी घरात असलेला जुना मोबाईल आणण्यासाठी सपना मगदूम आतल्या खोलीत जात होत्या. तेवढ्यात आरोपी महिला पाठीमागून आली आणि तिनं बेशुद्ध करण्याचं औषध सपना यांच्या नाकाला लावून त्यांना बेशुद्ध केलं. पलंगावर झोपलेल्या तीन महिन्यांच्या चिमुकलीला या महिलेने उचललं आणि आपल्यासोबत घेऊन पसार झाली, असा दावा सपना मगदूम यांनी केला होता.

**पोलिसी खाक्यानंतर सत्य उघड**

दरम्यान, पोलिसांनी याप्रकारानंतर जोमाने तपासाला सुरुवात केली होती. पोलिसांना या तपासादरम्यान काळंबेरं आलं. पोलिसांनी आपला खाक्या दाखवल्यानंतर सपना यांनी आपणच हे कृत्य केल्याचे मान्य केले.

# सावंतवाडीत उभे राहते टपऱ्यांचे साम्राज्य

**सिंधुदुर्ग-प्रतिनिधी-** ज्या सावंतवाडी शहराला टपरीमुक्त एकेकाळी करण्यात आले होते आज त्याच शहरात झपाट्याने टपरी वाढताना दिसत आहेत.आज हॉटेल चंदू भवन समोरील वाघ पाणंद मध्ये दोन अनधिकृत स्टॉल उभे राहिल्याने याला वरदहस्त कोणाचा याची चर्चा सध्या सावंतवाडी शहरात सुरू आहे.






संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# हा कसला अवकाळी हा तर बारमाही पाऊस

**गेल्या** दोन दिवसापासून राज्याच्या सर्व भागात पावसाचा धुमाकुळ सुरु आहे. गेल्या वर्षभराचा जरी आढावा घेतला तरी साधारणपणे सरासरी दर महिन्याला कुठे ना कुठे अवकाळी पाऊस पडल्याची नोंद पाहायला मिळते. कुठे गारपीट आहे. कुठे चक्रीवादळ आहे. कुठे अचानकपणे मुसळधार पाऊस तर अधूनमधून कोसळणाऱ्या बारीक बारीक सरी अनेकठिकाणी येऊन गेल्याचे पाहायला मिळते. म्हणून दर महिन्याला कोसळणाऱ्या या पावसाला अवकाळी पाऊस तरी कसा म्हणायचा असा प्रश्न पडतो. त्याला बारमाही पाऊस म्हणणेच जास्त योग्य ठरेल. पूर्वी शेतीला बारमाही पाणी मिळावे म्हणून शेतकरी वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करायचा. धरणातून, पाटातून किंवा आपापल्या शेतामध्ये विहीरी खोदून पाण्याची तजवीज करायचा. अर्थात अजूनही अशा पध्दतीने शेती करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. मात्र या वर्षाचा अनुभव घेतला तर बारमाही शेती करणाऱ्यांपुढेसुध्दा या बारमाही पावसाने संकटे उभी केली आहेत. म्हणजे ज्या शेतीमुळे वर्षभर पीक घेऊन शेतकरी आपले उत्पन्न वाढवीत होता. किंवा अशी शेती करणाऱ्या शेतकऱ्याला बागायतदार श्रीमंत शेतकरी म्हटले जायचे पण आज परिस्थिती अशी झाली आहे की, पाऊसच बारमाही कोसळतो. आणि शेतीचे उत्पन्न वाढण्याऐवजी नुकसान करून जातो. अगदी गेल्या महिन्याभरातसुध्दा राज्याच्या अनेक भागात पाऊस कोसळत राहिला. पावसाळा संपल्याची अधिकृत घोषणा वेधशाळेकडून झाली परंतु एकाअर्थी पावसाने निरोप घेतलेला नाही. त्याने कायमस्वरूपी मुक्काम जरी ठोकलेला नसला तरी कुठे ना कुठे दडून बसणारा पाऊस अचानकपणे सगळ्यांची त्रेधातिरपीट उडवतो. आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणतो. आतादेखील संपूर्ण राज्यभर सुरू असलेल्या या पावसाने अनेक पिकांचे अतोनात नुकसान केले आहे. काही दिवसापूर्वीच झालेल्या पावसाच्या नुकसानीची भरपाई मिळालेली नसताना नव्या नुकसानीची त्यात भर पडत जाते आहे. अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करीत शेतकरी पुन्हा उभे राहाण्याचा प्रयत्न करतो तोच त्याच्यावर नव्या संकटाचा भडीमार होतो आहे.

**लोकर देणाऱ्या मेंढ्याच मृत्युमुखी**

यावेळच्या पावसाचा तडाखा काही वेगळाच म्हणावा लागेल. हे चक्रीवादळही नाही किंवा वादळी वाऱ्यासह झालेली गारपीटही नाही. अनेकठिकाणी साधारणस्वरूपाचा पाऊस झाला पण तो दीड दीड दोन दोन दिवस प्रचंड सुरु राहिला. अरबी समुद्रातल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पाऊस आल्याचा निर्वाळा वेधशाळेने दिला आहे. त्याची स्वतंत्र कारणमिमांसा व्हायला हवी. परंतु साधारणपणे अवकाळी पाऊस एकदाच काय तो जोरात बरसून जातो त्यामुळे झालेल्या नुकसानीतून थोडेफार डोके वर काढता येऊ शकते. नुकसानग्रस्त होणाऱ्या पिकांना पुन्हा उन्हाचा आधार मिळतो आणि थोडेफार नुकसान टळू शकते. पण हा पाऊस मात्र अखंड पडत राहिल्याने शेतांमधून पाणी साचणं, कापूस, द्राक्षं, कांदा या पिकांना पाण्याबरोबरच धुकं आणि थंड वातावरणाचाही तितकाच मोठा फटका बसणं म्हणजे नुकसानीला काही मर्यादाच न राहाणं अशी ही विचित्र परिस्थिती राज्यभर झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रात केवळ या पावसामुळे निर्माण झालेली कडाक्याची थंडी पाचशे ते सहाशे मेंढ्यांचा जीव घेऊन गेली. ज्या मेंढ्यांपासून लोकर काढली जाते त्यातून थंडीचा बचाव करण्याकरीता कांबळे किंवा कोट बनवले जातात. त्या मेंढ्याच या कडाक्याच्या थंडीच्या बळी ठराव्यात हा एक विलक्षण प्रकार ठरतो. विदर्भात या पावसाचा जोर कमी असला तरीसुध्दा थंडीमुळे संत्रा बागांचे झालेले नुकसान, खानदेशात केळीला बसलेला फटका , नाशिकमध्ये द्राक्षांच्या बागांना दिलेला तडाखा , कोकणात तर हापूस आंब्याच्या मोहरावरच संक्रांत आलेली आहे. ऊसाच्या पिकावरही या पावसाचा मोठा परिणाम होत असल्याचे पाहायला मिळते. स्वाभाविकपणे वारंवार येणाऱ्या या संकटांमुळे शेतकरी त्रस्त झालेला आहे. विशेषतः अल्पभूधारक जो शेतकरी असतो. तो या संकटाशी सामना करू शकत नाही. कारण त्याने केलेली गुंतवणुक ही कर्जावू स्वरूपाची असते. येणाऱ्या पिकांमधून त्याची भरपाई व्हावी असा त्याचा अंदाज असतो. दुर्दैव असे आहे की भरपाई तर सोडाच परंतु नव्या नुकसानीच्या भडीमाराने तो आणखीनच गर्भगळीत होत आहे. सरकारकडून तातडीने मदत मिळेलच याची कोणतीही खात्री नसते.

**कमी दाबाचे पट्टे आणि नुकसानीचे रट्टे**

अनेकवेळेला वेधशाळांकडून या अवकाळी पावसाचे अंदाज व्यक्त होत असतात पण त्यामुळे शेतकरी आपले नुकसान टाळू शकत नाही कारण शेतात उभी असलेली पीके त्याला कापता येत नाही. किंवा त्याचे संरक्षण करणेही त्याच्या हातात नसते. गेल्या वर्षभरात कधी अरबी समुद्र किंवा पश्चिम बंगालचा उपसागर या ठिकाणी कमी दाबाचे पट्टे निर्माण झाले आणि चक्रीवादळ, पाऊस यांनी धुमाकुळ घातला. याबाबतीत अगदी सहजपणे असे लक्षात येते की, दहा वर्षापूर्वी वर्षातून एकदोनदा कमी दाबाचे पट्टे निर्माण होऊन पाऊस किंवा चक्रीवादळ होण्याचा प्रकार घडत असेल. परंतु गेल्या वर्षभरात या कमी दाबाच्या पट्ट्यांनीसुध्दा सगळेच विक्रम मोडलेले दिसतात. अचानकपणे वारंवार असे कमी दाबाचे पट्टे निर्माण होण्याची कारणे तरी काय की ज्यामुळे या अवकाळी पावसांचे थैमान सुरु राहाते म्हणजेच याबाबतचा भौगोलिक किंवा पर्यावरण विषयक सखोल अभ्यास खूप गरजेचा ठरतो. निसर्ग चक्र किंवा नैसर्गिक आपत्ती म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या अवकाळी पावसाचे प्रकार जर वाढत असतील तर त्याची मूळ कारणे शोधणे अत्यंत गरजेचे ठरते. याचा आग्रह कोणी धरायचा पर्यावरण तज्ज्ञांनी याबाबत पुढाकार घ्यायचा किंवा महाराष्ट्रासारख्या एका प्रगत राज्याने केंद्राकडे धोशा लावून अभ्यासाची मागणी करायची याबाबतही खरे तर ठोस निर्णय झाला पाहिजे. अन्यथा हे कमी दाबाचे पट्टे सामान्यांच्या पाठीवर नुकसानीचे रट्टे हाणतच राहातील.

# भीम आर्मीची राज्यव्यापी संविधान जनजागृती यात्रा मानखुर्दमध्ये

**मुंबई, प्रतिनिधी-** भारतीय संविधानाविषयी लोकांमध्ये जागृती करण्यासाठी भीम आर्मी भारत एकता मिशन या सामाजिक संघटनेने राज्यव्यापी संविधान जनजागृती यात्रेचे आयोजन केले असून ३ डिसेंबर रोजी ही यात्रा मानखुर्दमध्ये प्रवेश करीत आहे. ६ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता या यात्रेचा दादर चैत्यभूमी येथे समारोप होणार आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

व्यक्तीमत्वाला आणि स्वभावाला न शोभणाऱ्या भूमिका नाईलाजास्तव साकारायला भाग पाडणारा अनियंत्रित चित्रपट म्हणजे आयुष्य.

## पंचांग

**शुक्रवार ३ डिसेंबर, २०२१**
**शक १९४३ प्लवनामसंवत्सर**

*** कार्तिक कृष्ण चतुर्दशी * नक्षत्र -विशाखा**

**रवी उदय- ०६-५७,**
**रवी अस्त- १७-५९**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०८-२६ तूळ**
**०८-२७ ते २४-०० वृश्चिक**

अमावास्या सायं. ४.५६ नंतर

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**
संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४
Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## निविदा सूचना

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे वर्णन | कामाची अंदाजित रक्कम रु. लाखात / बयाना रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | ३००००२३५५८ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ४ येथील ४०० KV ब्रेकरसाठी युनिव्हिस जे १३ हायड्रॉलिक तेलाचा पुरवठा करणे. | १५.९५/- १९,४५०/- |
| ०२ | ३००००२३३७८ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. १ साठी Injector studs & nuts चा पुरवठा करणे. | ४.८७/- ८,३७५/- |
| ०३ | ३००००२३६९२ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. १ व २ येथील २२० KV स्वीचयार्डमधील १० MVA क्षमतेच्या रोहित्रांसाठी ११ KV, CT व PT यांचा पुरवठा करणे. | ३.२१/- ६,७१०/- |
| ०४ | ३००००२३७४८ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. १ व २ येथे मल्टीकोर टेलिफोन केबलचा पुरवठा करणे. | १७.४९/- २०,९९५/- |
| ०५ | ३००००२३७७६ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. १ व २ येथील एच.टी. व एल.टी. लाइन्स जवळचे जंगल कटींग आणि २२० KV स्विचयार्ड येथील गवत आणि झाडे झुडपे काढण्याचे काम करणे. | ७.९५/- ११,४५१/- |
| ०६ | ३००००२३८४६ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. १ व २ येथे LED Lights चा पुरवठा करणे. | ७.९१/- ११,४११/- |
| ०७ | ३००००२३९२४ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी वसाहत परिसरातील रस्ता व जमिनिखालून केबल टाकण्याचे काम करणे. | ८.८६/- १२,३६१/- |
| ०८ | ३००००२३९४९ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी अंतर्गत शिरळ पंप हाऊस येथील १२५० केव्हीए ट्रान्सफार्मरच्या बॅरीअर बोर्ड बदलण्यासह दुरुस्तीसाठी पूर्ण तपासणी आणि दुरुस्तीचे काम करणे. | २.९६/- ६,४६०/- |
| ०९ | ३००००२३८८० | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ३ येथील सध्या अस्तित्वात असलेली रोटर जॅकिंग सिस्टीम हायड्रो स्टॅटीक लुब्रीकेशन बसवून अद्ययावत करण्याचे काम करणे. | ६३.००/- ६६,५००/- |
| १० | ३००००२३९८९ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. १ व २ येथील गव्हर्निंग कार्डस आणि टायमर सहीत एल.बी.बी. प्रोटेक्शन रिलेचे दुरुस्तीचे काम करणे. | ३.८४/- ७,३३८/- |
| ११ | ३००००२३९४५ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ४ येथे ऑटो सिंक्रोनाइझिंग रिलेचा पुरवठा करून बसविण्याचे काम करणे. | ११.५१/- १५,०१०/- |
| १२ | ३००००२३९४७ | कोयना धरण पायथा विद्युत गृह कोयनानगर येथे ३ × १० TR पॅकेज युनिट बदलून नविन वॉटर कुल्ड ११ टि आर क्षमतेचे ए.सी. पॅकेज युनिट बसविण्याचे काम करणे. | १७.४४/- २०,९३८/- |
| १३ | ३००००२३९६२ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ३ येथे जनरेटर एंड वॉडिंग कॅप्स आणि कॉपर फेरल्सचा पुरवठा करणे. | ३.८७/- ७,३७५/- |
| १४ | ३००००२४००७ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ३ येथे १९८ केव्ही आणि ९६ केव्ही लाइटनिंग अरेस्टरचा पुरवठा करणे. | ७.५६/- ११,०५८/- |
| १५ | ३००००२४०१६ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ३ येथील एअर व्हेंट बॉल आणि कप सीलचा पुरवठा करणे. | १.०२/- ३,०५३/- |
| १६ | ३००००२४०५५ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ४ येथे Insulation tester, clamp meter and multimeter यांचा पुरवठा करणे. | २.६३/- ६,१३३/- |
| १७ | ३००००२४०४२ | कोयना धरण पायथा विद्युतगृह कोयनानगर येथील संच क्र. १ च्या रोहित्रांचे तेल बदलणे व संच क्र. २ च्या रोहित्रांचे तेल शुद्धीकरण करणे. | १.६०/- ४,७९४/- |

**निविदा किंमत ११८०/- प्रत्येकी निविदा ई-टेंडरींगच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केल्याची तारीख ०३/१२/२०२१ निविदा विक्री कालावधी दि. ०३/१२/२०२१ ते २२/१२/२०२१, १७.०० वा. पर्यंत. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ दि. २३/१२/२०२१ रोजी १७.०० वा. पर्यंत. निविदा उघडण्याची तारीख व वेळ शक्यतो दि. २३/१२/२०२१ रोजी १७.०० वा.**

**टीप:१)** वरील निविदांचा संपूर्ण तपशील महानिर्मितीच्या ई-टेंडरींगच्या - https://eprocurement.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. **२)** वरील निविदा, महानिर्मितीच्या ई-टेंडरींगमध्ये नोंदणीकृत पुरवठादार / ठेकेदार (e-tendering Registered Vendors) यांनाच उपलब्ध होतील. तरी ई-टेंडरींगमध्ये नोंदणीकृत नसलेल्या बोलीधारकांनी **(on-line Registration)** करून पुढील कार्यवाहीसाठी त्यांना जवळ असलेल्या पॉवर स्टेशनशी संपर्क साधवा. अधिक माहिती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. महानिर्मिती कंपनीने दिनांक १०.०४.२०१३ पासून **Online Payment** पध्दत अंमलात आणलेली असल्याने निविदे संदर्भातील सर्व देयके/शुल्क फक्त **Online** पध्दतीद्वारेच स्विकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**मुख्य अभियंता**
(को.ज.वि.कें.सं.पोफळी).

**जाहीर सुचना**

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका क्रं. ए/१०१, पहिला मजला, गोल्डन बाग ए बिल्डींग को. ऑप. हौ. सो. लि., ओम नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर, या मिळकतीचे मालक श्री. राजु फिलीप हे होते व त्यांचे दिनांक १२/०६/२०२१ रोजी निधन झाले असून त्यांच्या मृत्यूपश्चात सदर सदनिका व त्याचे शेअर्स त्यांची पत्नी व वारस श्रीमती रेचेल राजु याच्या नावे हस्तांतरीत करावयाचे सदर सोसायटीने ठरविले आहे. व त्याकरीता मयत व्यक्तीचे वारस व मुले यांनी ना हरकत दिली असून सदर सदनिकेचे मालकी हक्क निर्वीवाद करण्याकामी हरकती मागवित आहोत. जर इतर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत कोणताही हक्क, दावा आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येतील व सदर मिळकतीचे शेअर्स त्याच्या मालकी हक्कासहीत श्रीमती रेचेल राजु यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात येतील याची नोंद घ्यावी

**पत्ता – श्री. पराग ज. पिंपळे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर ४०१२०२
मो. ९८९००७९३५२ दिनांक:०३.१२.२०२१

**जाहीर नोटीस**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, औद्योगिक गाळा क्र. १८, पहिला मजला, नवयुग इंडस्ट्रीयल प्रीमायसेस को. ऑप. सो. लि., धनराज पेन कंपाउंड, वझीर ग्लास लेन, जे. बी. नगर, सीटीएस नं. १८३ ए. मौजे मुळगांव, अंधेरी पुर्व, मुंबई, ही मिळकत १. श्री. हर्षद सी. शहा २. श्री. भूपेन्द्र एन. शहा हयांच्या मालकिची व कब्जेवहीवाटीची असुन सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल मे. एसएनए इन्फोटेक प्रा. लि., यांस कायमस्वरुपी विकण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीवर कुणाही इसमाचा अथवा संस्थेचा वारसाहक्क, अधिकार, हितसंबंध, दावा, गहाण इ. असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांच्या ००४, प्रविण पॅलेस, दिन दयाळ नगर, वसई रोड प., जि. पालघर–४०१ २०२ हया पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह कळवावे अन्यथा कुणाचाही वारसाहक्क, अधिकार, हितसंबंध, दावा, गहाण इ. नाही असे समजुन व्यवहार पुरा केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी

**पत्ता – ॲड. श्री. पराग ज. पिंपळे,**
**बी.ए.एल.एल.बी वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर
दिनांक: ०३ डिसेंबर २०२१

**जाहीर सूचना**

याद्वारे तमाम जनतेला सूचना देण्यात येत आहे की, माझी अशिल, श्रीमती रोझालीन जॉन डिसोझा, पुढील नमूद निवासी मिळकत मूळ भाडेकरू श्री. पिटर झेवियर डिसोझा, रूम नं. ७, ओ. पी. नं. १४७-सी, फर्नांडिस वाडी, डी. एल. वैद्य रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८, ह्यांच्या नावावरून त्यांच्या नावे करीत आहेत. सदर वरील मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तीचा विक्री, अदलाबदल, गहाण, बक्षीस, वारसा-हक्क, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरू, परवाना, देखभाल, धारणाधिकार या मार्गाने दावा किंवा हरकत असल्यास, तो / ती / ते त्यांच्या स्वाक्षरी असलेल्या कागदोपत्री पुराव्यासह अधोहस्ताक्षरीशी किंवा सहाय्यक अभियंता (टी.पी.), जी/उत्तर वॉर्ड,खोली क्रमांक ३६, पहिला मजला, हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.), मुंबई ४०००२८ यांना संपर्क साधू शकतात. त्याचे/तिचे/त्यांचे हक्क/ आक्षेप/ दावे/ विवादांचे तपशील सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, न आल्यास, माझी अशिल वरील हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढे जाईल व अशा दाव्यांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय आणि अशा व्यक्तीचे कोणतेही दावे, माफ केले किंवा सोडून दिले किंवा आत्मसमर्पण केलेले मानले जातील आणि माझ्या अशिल बंधनकारक राहणार नाहीत.

श्री. एग्नेल व्ही. फर्नांडिस
वकील, मुंबई उच्च न्यायालय,
पत्ता: २०५, बिल्डिंग नं. २, रामश्याम कृपा सह. गृह., बी. एस. रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. मो. ९८७०१०३०८१

ठिकाण - मुंबई
तारीख-०३-१२-२०२१.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## वीज बंद निवेदन

पालघर जिल्हयातील संबंधीत वीज ग्राहकांना कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, महावितरण, विभागिय कार्यालय पालघर यांच्या अखत्यारीत येणाऱ्या पुढील वीज वाहीन्या व परिसरातील वीज पुरवठा तातडीच्या देखभालीच्या व दुरुस्तीच्या कामासाठी खाली दिलेल्या कोष्टका मधिल तारखे नुसार बंद राहणार आहेत. तरी याची नोंद घेऊन महावितरण कंपनीस सहकार्य करावे ही नम्र विनंती. वीज ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोई बद्दल महावितरण कंपनी दिलगीरी व्यक्त करीत आहे.

| अनु. क्र. | उपकेंद्र व वाहिनी | वीज पुरवठा खंडीत परिसर | वीज पुरवठा खंडीत होण्याची तारीख | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | (११ केव्ही वहिनी नं.२ (३३/११ केव्ही कॉन्टेसा उपकेंद्र) | प्लॉट सी, प्लॉट एच व इतर बोईसर औदयोगिक परिसर | ०३.१२.२०२१ | सकाळी १०.०० ते सायंकाळी १७.३० |
| २. | ११ केव्ही गीनी वहिनी (११/११ केव्ही स्विचिंग उपकेंद्र) | प्लॉट ई व इतर बोईसर औदयोगिक परिसर | ०३.१२.२०२१ | सकाळी १०.०० ते दुपारी १४.०० |

**कार्यकारी अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.मर्या., पालघर विभाग, पालघर.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

No.SRA/ED/OW/45650/3C/PS/2021 दिनांक २६/११/२०२१

## जाहीर सूचना

याव्दारे कळविण्यात येते की, श्री. पवन बी. पुरोहीत यांच्यावतीने त्यांचे संबंधित क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ कलम ३ क (१) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत विनंती अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करावयाच्या प्रस्तावित मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | गावाचे नाव | न.भु.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | धारक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मौजे–पहाडी गोरेगांव (पू.), तालुका–बोरीवली | २६६ | २५१.०० | श्री. पवन बी. पुरोहीत |
| २ | | २६६/१ | १८.२० | |
| ३ | | २६६/२ | १४.३० | |
| ४ | | २६६/३ | १४.१० | |
| ५ | | २६६/४ | १४.१० | |
| ६ | | २६६/५ | १४.१० | |
| ७ | | २६६/६ | १४.१० | |
| ८ | | २६६/७ | १४.१० | |
| ९ | | २६६/८ | १४.१० | |
| १० | | २६६/९ | १४.१० | |
| ११ | | २६६/१० | १४.०० | |
| १२ | | २६६/११ | १५.७० | |
| १३ | | २६६/१२ | १५.४० | |
| १४ | | २६६/१३ | १५.४० | |
| १५ | | २६६/१४ | १५.४० | |
| १६ | | २६६/१५ | १५.४० | |
| १७ | | २६६/१६ | १५.४० | |
| १८ | | २६६/१७ | १५.४० | |
| १९ | | २६६/१८ | १५.४० | |
| २० | | २६६/१९ | १६.१० | |
| | | एकूण | ५३६.३० | |

**घोषीत करावयाच्या मिळकतींचे क्षेत्र व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे**
**मौजे–पहाडी गोरेगांव (पू.) तालुका–बोरीवली**

| अ. क्र. | न. भू. क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | घोषीत करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | एकत्रित चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | २६६ | २५१.०० | २५१.०० | न. भू. क्र. २७२ | न. भू. क्र. २६७ | न. भू. क्र. २६५ | न. भू. क्र. २६८ |
| २ | २६६/१ | १८.२० | १८.२० | | | | |
| ३ | २६६/२ | १४.३० | १४.३० | | | | |
| ४ | २६६/३ | १४.१० | १४.१० | | | | |
| ५ | २६६/४ | १४.१० | १४.१० | | | | |
| ६ | २६६/५ | १४.१० | १४.१० | | | | |
| ७ | २६६/६ | १४.१० | १४.१० | | | | |
| ८ | २६६/७ | १४.१० | १४.१० | | | | |
| ९ | २६६/८ | १४.१० | १४.१० | | | | |
| १० | २६६/९ | १४.१० | १४.१० | | | | |
| ११ | २६६/१० | १४.०० | १४.०० | | | | |
| १२ | २६६/११ | १५.७० | १५.७० | | | | |
| १३ | २६६/१२ | १५.४० | १५.४० | | | | |
| १४ | २६६/१३ | १५.४० | १५.४० | | | | |
| १५ | २६६/१४ | १५.४० | १५.४० | | | | |
| १६ | २६६/१५ | १५.४० | १५.४० | | | | |
| १७ | २६६/१६ | १५.४० | १५.४० | | | | |
| १८ | २६६/१७ | १५.४० | १५.४० | | | | |
| १९ | २६६/१८ | १५.४० | १५.४० | | | | |
| २० | २६६/१९ | १६.१० | १६.१० | | | | |
| | एकूण | ५३६.३० | ५३६.३० | | | | |

उपरोक्त नमुद मिळकत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत जमीन मालक अथवा कोणाही हितसंबंधीताची हरकत असल्यास, त्यांनी आपली हरकत सदर जाहीर सूचना प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे लेखी दाखल करणेबाबत कळविण्यात येत आहे.

**(सतिश लोखंडे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

**ठिकाण : बांद्रा (पू), मुंबई**
**दिनांक : २६/११/२०२१**

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. २६५६५८००/२६५९०४०५/१८७९ फॅक्स क्र. ९१-२२-२६५९०४५७ संकेतस्थळ : info@sra.gov.in

# अभिनेत्रीकडे आत्मविश्वास हवाच!



दिव्या खोसला-कुमार हिचे नाव केवळ अभिनेत्री म्हणूनच नव्हे तर निर्माती आणि दिग्दर्शिका म्हणूनही प्रसिद्ध आहे. टी-सीरिजच्या भूषणकुमार यांची पत्नी म्हणून तिला निर्माती व्हायचीही संधी मिळाली. तिने 'सनम' आणि 'यारीयां' या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. नुकतीच ती 'सत्यमेव जयते-२' या सिनेमात प्रमुख नायिका म्हणूनही चमकली. याच पार्श्वभूमीवर तिच्याशी केलेली बातचीत...

**दिव्या, अभिनय आणि दिग्दर्शन यापैकी सोपे काय वाटते?**

- खरं सांगायचं तर दिग्दर्शनापेक्षा अभिनय करणं खूपच सोपं आहे.

**जॉन अब्राहमसोबत सेटवर तुमचे कितपत जमू शकले?**

- 'सत्यमेव जयते-२' सुरू होण्यापूर्वीच जॉनशी माझी चांगली मैत्री झाली होती. आमचं हेच बॉन्डींग पडद्यावरही लोकांनी पाहिलेच आहे. या सिनेमाच्या दोनतीन गाण्यांमध्ये आमची केमिस्ट्री आवडल्याचे चाहत्यांनी आवर्जून नमूद केले आहे. एकमेकांसोबत काम करायला आम्ही दोघेही कंफर्टेबल होतो. सेटवर तो पूर्ण तयारीनेच यायचा. शूटिंग सकाळी पाच वाजता लावले तरी परफेक्ट वेळेवर तो हजर व्हायचा याची मला कमाल वाटते. आपलं काम तो पूर्ण निष्ठेने करतो यात वादच नाही.

**सध्या तुम्हाला दिग्दर्शनाची किती आठवण येतेय?**

- खूपच... दिग्दर्शनाचं काम पूर्ण करून हा सिनेमा साईन केला आणि अभिनय सुरू केला तेव्हाच आपण काही मिस करतोय असं मनोमन वाटायला लागलं होतं. मात्र आपण नुसते बसून राहिलेलो नाही, अभिनय तरी करतोय हे मनात आले तेव्हा थोडे समाधान वाटले.

**मिलाप जव्हेरी तुम्हाला दिग्दर्शन करत होते, तेव्हा तुमच्यातली दिग्दर्शिका जागी झाली नाही?**

- नक्कीच नाही... कारण जेव्हा तुम्ही अभिनेत्री म्हणून सेटवर जाता तेव्हा तुमची मनःस्थिती वेगळी असते. आपला सीन जास्तीत जास्त चांगला कसा होईल यावरच लक्ष केंद्रीत होत असते. दिग्दर्शकाला सर्व बाजूने विचार करायचा असतो. अभिनेत्री म्हणून मला केवळ मिलाप जव्हेरी सांगतील तसा सीन द्यायचा होता. बाकी काही नाही. मी तेच केले.

**विवाहित नटीकडे प्रेक्षकांचा बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो असं नाही तुम्हाला वाटत?**

- आता तसं राहिलेलं नाही. काळ बदलला आहे. मी विवाहित असूनही माझ्या गाण्यांना प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत होता हे मी अनुभवले आहे. आताचे प्रेक्षक अभिनेत्रीकडे नाही, तिने साकारलेल्या भूमिकेकडे पाहतात. हे जर दमदार असेल तर नटी विवाहित आहे की नाही याकडे प्रेक्षक मुळीच लक्ष देत नाहीत. नटीचे कुणाशी काय नातं आहे याच्याशी प्रेक्षकांना काही देणंघेणं नसतं. आता महिला सशक्तीकरण आहे. दीपिका पदुकोण असो की करीना कपूर, विवाहित असण्यामुळे त्यांच्यावर काहीच परिणाम झालेला नाहीये.

**अभिनेत्रीसाठी सर्वात महत्वाचं काय असतं?**


- मला वाटतं अभिनेत्रीमध्ये आत्मविश्वास असला पाहिजे. अभिनयच नाही, तर दिग्दर्शन सुरू करतानाही सेल्फ कॉन्फिडेन्स हवाच. आपण जे काम हातात घेतोय ते आपल्याला कितपत येतंय, त्यात आपले प्राविण्य आहे का हे त्या अभिनेत्रीला ठावूक असले पाहिजे. कुटुंबीयांचा सपोर्ट मला हवाच असतो आणि ते मला सपोर्ट देतातही, पण माझा प्रत्येक निर्णय हा फक्त माझाच असतो. मी कुणाकडे सल्ले विचारायला जात नाही. दिग्दर्शकाच्या हिशेबाने मी चालते.

## 'फ्री हिट दणक्या'ने होणार सगळ्यांचीच 'दांडी गुल'



क्रिकेट हा जोश, उत्साहाचा खेळ असून भारतात त्याला वेगळेच स्थान आहे. याच खेळावर आधारित 'फ्री हिट दणका' या आगामी चित्रपटातील 'दांडी गुल' हे जोशपूर्ण गाणे सोशल मीडियावर प्रदर्शित झाले आहे. या चित्रपटातील 'रंग पिरतीचा बावरा' हे गाणे प्रदर्शित झाले असून प्रेक्षकांचा त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. 'दांडी गुल' हे गाणे 'फँड्री' फेम सोमनाथ अवघडे, अपूर्वा एस. तसेच 'सैराट' चित्रपटातील सुपरहिट जोडी अरबाज (सल्या) आणि तानाजी (लंगड्या) यांच्यावर चित्रित करण्यात आले आहे. या गाण्यात सोमनाथ आणि तानाजी अगदी सहज नृत्य करताना दिसत असले तरी त्यासाठी त्यांनी बरीच मेहनत घेतली आहे. सोमनाथ आणि तानाजी हे उत्तम अभिनेते आहेत परंतु नृत्यात ते तितकेसे निपुण नसल्याने नृत्यदिग्दर्शक सुजित कुमार यांनी या गाण्याच्या चित्रीकरणाअगोदर दोघांकडूनही १५ दिवस नृत्याची कार्यशाळा घेतली. या सरावादरम्यान अनेकदा दोघांचे पाय सुजले आहेत परंतु जिद्द न सोडता त्यांनी सराव पूर्ण केला. त्यांची ही मेहनत आपल्याला या गाण्यातून दिसते. नेहमी पेक्षा वेगळ्या धाटणीचे, गावरान बाज असलेले हे गाणे प्रत्येकाला थिरकायला लावणारे आहे. १७ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून क्रिकेटमधील संघर्ष, चुरस, उत्सुकता, डावपेच तसेच ग्रामीण भागातील रांगडेपणा, ग्रामीण भाषेतील लहेजा हे सर्व प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

## टक्कल करेन असे कधीच वाटले नव्हते



मराठा साम्राज्यातील एका कुशल प्रशासक आणि मुत्सद्दी राजकारणी असलेल्या, पण आजवर दुर्लक्षित राहिलेल्या 'काशीबाई बाजीराव बल्लाळ' यांच्या जीवनावर याच नावाची मालिका नुकतीच सुरू झाली आहे. यात अभिनेता विशाल चौधरी याने काशीबाईंचे बंधू बाळाराव जोशी यांची भूमिका साकारली आहे. बाळाराव हे स्वभावतःच बंडखोर वृत्तीचे होते, पण त्यांचे काशीबाई आणि आपल्या आईवर प्रेम असते. या व्यक्तिरेखेसाठी त्याने आवश्यक ती सर्व कौशल्ये शिकून घेतली असून त्याला या भूमिकेसाठी आपल्या डोक्याचा चकोट करून घ्यावा लागला. याबाबत बोलताना विशाल चौधरी म्हणाला, मी मॉडेलिंगच्या क्षेत्रातून आलो असल्याने एखाद्या भूमिकेसाठी डोक्यावरचे सर्व केस कापून चकोट करण्याची कल्पनाही मी कधी केली नव्हती. मला सशक्त भूमिका रंगवायला आवडतात. बाळाराव जोशी यांची व्यक्तिरेखा ही अशीच शक्तिशाली भूमिका आहे. ते स्वभावानेच बंडखोर वृत्तीचे होते, पण आपल्या आवडत्या लोकांच्या पाठिशी ते नेहमीच भक्कमपणे उभे राहात. या व्यक्तिरेखेसाठी माझी निवड करण्यात आली तेव्हा डोक्याचा चकोट करावा की नाही, याबद्दल मी साशंक होतो. पण निर्मात्यांच्या टीमने या भूमिकेच्या अस्सलपणाची मला खात्री पटवून दिली. काशीबाईंच्या जीवनातील बाळारावांचं स्थान किती महत्त्वाचं आहे, ते त्यांनी मला पटवून दिलं आणि या मालिकेत भूमिका साकारण्याचा माझा निर्णय योग्यच होता, याची मला खात्री पटली, असेही तो म्हणाला.

## राजेश्वरी खरात आता बॉलीवूडमध्ये



'फॅण्ड्री' या बहुचर्चित चित्रपटातून घरोघरी पोहचलेली अभिनेत्री राजेश्वरी खरात हिला बॉलीवूडचे तिकीट मिळालेय. 'पुणे टू गोवा' या चित्रपटातून राजश्री बॉलिवूडमध्ये पदार्पण करत असून या अगोदर राजश्रीने 'फॅण्ड्री' आणि 'आयटमगिरी' या मराठी चित्रपटात झळकली होती. अमोल भगत दिग्दर्शित 'पुणे टू गोवा' या चित्रपटात राजेश्वरी दिसणार आहे. तिच्याबरोबर नवोदित अभिनेता आदित्यराजे मराठे हादेखील बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. या हिंदी चित्रपटाची निर्मिती आदित्यराजे यानेच मोरया प्रॉडक्शन हाऊसच्या साथीने केली आहे. हा चित्रपट कॉमिडी, सस्पेन्स, थ्रिलर, आणि ॲक्शन अशा स्वरुपाचा आहे. मुळात हा चित्रपट संघर्ष करणाऱ्या कलाकारांच्या पुणे ते गोव्याच्या प्रवासावर आधारित आहे, पण या कथेतून अनेक रोमांचक अनुभव, रहस्यमय घटना आणि प्रवासादरम्यान येणाऱ्या धोकादायक परिस्थितींवर प्रकाश टाकण्यात आला आहे, अशी माहिती दिग्दर्शक भगत यांनी दिली.

## सारेगमप लिटिल चॅम्प्स स्पर्धकांनी घेतले राज ठाकरेंचे आशिर्वाद!



सारेगमप लिटिल चॅम्प्सच हे नवीन पर्व गाजलं आणि अगदी सुरुवातीपासूनच प्रेक्षकांनी या पर्वाला पसंती दर्शवली. या १४ स्पर्धकांचा प्रवास प्रेक्षकांनी पाहिला. या १४ अप्रतिम गाणाऱ्या स्पर्धकांमध्ये कोण वरचढ आहे हा निर्णय घेणं पंचरत्नांसाठी सुद्धा कठीण होतं. ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून, पलाक्षी दीक्षित, ओंकार कानेटकर, गौरी गोसावी, प्रज्योत गुंडाळे, सारंग भालके, रीत नारंग आणि स्वरा जोशी हे सात स्पर्धक महाअंतिम सोहळ्यात एकमेकांशी स्पर्धा करणार आहेत. हे सातही स्पर्धक प्रेक्षकांचे लाडके आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये कोण विजेता ठरणार हे सांगणं खूपच अवघड आहे. महाअंतिम सोहोळ्याआधी या ७ ही जणांनी मनसे प्रमुख 'राजसाहेब ठाकरे' यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. हे स्पर्धक राजसाहेबांना भेटून खूप भारावून गेले. राज ठाकरेंनी या मुलांना इलेक्ट्रिक तानपुरा आणि तबला भेट दिला. यावेळी राज ठाकरेंनी त्यांच्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. सारेगमप लिटिल चॅम्प्सच्या महाअंतिम सोहळा रविवार ५ डिसेंबर रोजी संध्या. ७ वा. फक्त झी मराठीवर प्रसारित होईल.

## 'बळी' अमेझॉन प्राइमवर




अॅमेझॉन प्राइम व्हिडिओने आज मराठी हॉरर थ्रिलर चित्रपट 'बळी'च्या जागतिक रीलीजची घोषणा केली. या चित्रपटामध्ये मराठी चित्रपट सृष्टीमधील सर्वात प्रख्यात कलाकार स्वप्नील जोशी, पूजा सावंत व समर्थ जाधव असणार आहेत. प्रतिष्ठित चित्रपटनिमार्ता विशाल फ्यूरिया यांचे दिग्दर्शन आणि अर्जुन सिंग बराण व कार्तिक डी.निशानदार यांच्या ग्लोबल स्पोर्टस् एंटरटेन्मेंट ॲण्ड मीडिया सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारे निर्मित चित्रपट 'बळी' ९ डिसेंबर रोजी प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होण्यास सज्ज झाला आहे.चित्रपट ह्यबळी' विधुर, मध्यमवर्गीय वडिल श्रीकांतच्या (स्वप्नील जोशी) जीवनप्रवासाला दाखवतो. त्याचा ७ वर्षाचा मुलगा मंदार (समर्थ जाधव) चक्कर येऊन पडतो आणि सविस्तर निदानासाठी त्याला जनसंजीवन हॉस्पिटलमध्ये नेते जाते. येथून श्रीकांतच्या जीवनाला अनपेक्षित कलाटणी मिळते.

## 'आशिकी आ गई' गाण्यात प्रभास - पूजाची दमदार केमिस्ट्री !



सुपरस्टार प्रभासचा 'राधे श्याम' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून चित्रपटाबद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. चित्रपटातील प्रत्येक गोष्ट चर्चेचा विषय बनली असून चित्रपटातील पहिले हिंदी गाणे रिलीज झाले आहे.राधे श्यामच्या टीमने आपल्या सोशल मीडिया हँडलवर आगामी हिंदी गाणे 'आशिकी आ गई' शेअर केले आहे. गाण्यात प्रभास पूजाला बाइकवरून वेगवेगळ्या लोकेशन्सवर घेऊन जातो आहे. या गाण्यामध्ये उत्कृष्ट केमिस्ट्रीची झलक दिसत आहे, जी चित्रपट आपल्यासमोर आणण्याचे वचन देतो. पूजा हेगडे आणि प्रभासची जोडी आपण खूप जवळून अनुभवू शकतो ज्यावर चाहते कमेंट्सद्वारे आपल्या भावना व्यक्त करत आहेत.अरिजित सिंगने गायलेल्या या गाण्याला मिथुनने संगीत दिले आहे. हा चित्रपट १४ जानेवारी २०२२ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## 'बॉईज-२' फेम प्रतिकचे नवे गाणे




प्रतिक लाड हे नाव प्रेक्षकांना 'बॉईज-२' या चित्रपटामुळे चांगलेच परिचयाचे आहे. हाच प्रतिक आता 'टपोऱ्या डोळ्यांतून' या सोलो म्युझिक अल्बममधून पुन्हा प्रेक्षकांसमोर येतोय. प्रतिकचा धमाकेदार परफॉर्मन्स या गाण्यातून प्रत्यक्षात पाहायला मिळणार आहे. हे एक रोमँटिक सॉंग असून यांत प्रियकर आणि प्रेयसीच्या प्रेमाचे अचूक वर्णन करण्यात आले आहे. आताच्या तरुणाईला भावेल असे हे गाणे असून प्रत्येक रसिक प्रेक्षकांच्या ओठांवर हे गाणे रुळेल, अशी शक्यता निर्मात्यांनी व्यक्त केली आहे. या गाण्यात प्रतिक लाड आणि सोनाली दळवी यांची लव्हेबल केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. हे गाणे पंकज दत्तू वारुंगसे यांनी लिहिले असून त्याला संगीतही त्यांनीच दिले आहे, तर गायक ऋषिकेश शेलार याने हे गाणे गायले आहे. प्रतिकचा रोमँटिक आणि थोडासा विनोदी अभिनय पाहण्यासाठी हे गाणे औत्सुक्याचे ठरणार आहे. हे गाणे चेतन गरुड प्रॉडक्शन यांच्या युट्यूब चॅनेलवर तसेच इतर सोशल पोर्टल्सवर पाहता येणार आहे. फार कमी वेळात या गाण्याला मिळालेल्या विशेष पसंती पाहून हे गाणे नक्कीच रसिक प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेईल यांत शंकाच नाही.

## भूमिकेसाठी देहबोली, वर्तणूक, पेहराव बदलला



झी टीव्हीवरील 'पिया अलबेला' मालिकेतील भूमिकेनंतर अभिनेता अविनाश वाधवान तब्बल दोन वर्षांनी परतत आहेत. आता ते 'अगर तुम ना होते' या मालिकेत गजेन्द्र पांडे या भूमिकेद्वारे टीव्हीवर पुनरागमन करत आहेत. मालिकेत नायक अर्जुनचे वडील गजेन्द्र पांडे यांची व्यक्तिरेखा अविनाश साकारणार आहेत. गजेन्द्र पांडे हे उत्तर प्रदेशातील श्रीमंत, प्रभावशाली आणि धूर्त पॉवर ब्रोकर असतात. ते शक्तिशाली आणि अधिकारी व्यक्ती असून त्यांनी एखादे काम मनावर घेतले, की ते पूर्ण केल्याशिवाय ते राहत नाहीत. त्यांचे आपल्या कुटुंबियांवर खूप प्रेम असते आणि कुटुंबाला एकत्र ठेवण्यासाठी ते कोणत्याही टोकाला जाऊ शकतात. त्यांच्या व्यक्तिरेखेला काळी बाजू आहे, असे वाटत असले तरी कथानक जसजसे उलगडेल, तसतसे प्रेक्षकांना दिसेल की त्यांचे आपल्या कुटुंबावर अतिशय प्रेम आहे. त्यांचे आपल्या मुलाबरोबर खटके उडत असले तरी गरजू व्यक्तीला मदत करण्याचा त्यांचा स्वभाव असतो. आपल्या भूमिकेबद्दल ते म्हणाले, 'तब्बल दोन-अडीच वर्षांच्या सक्तीच्या विश्रांतीनंतर टीव्हीच्या पडद्यावर पुन्हा झळकताना मला आनंद होतोय. या भूमिकेच्या अंतरंगात शिरण्यासाठी मी माझी देहबोली, कपडे आणि अगदी वर्तनही बदलले. वैयक्तिक जीवनात माझा स्वभाव गजेन्द्र पांडे यांच्या निष्ठूर आणि दिखाऊपणापेक्षा अगदीच विरुध्द आहे. त्यामुळे गजेन्द्र पांडेंची व्यक्तिरेखा उभी करणं माझ्यासाठी तसं आव्हानाच होतं.'

# नवाकाळ कोडे-१५



**आडवे शब्द –** २. भ्रमराचे गुणगुणणे ५. प्रियकर, साजण ७. ताब्यात घेतलेले ९. सुंभ, जाड दोर ११. गायब १३. एक लोकप्रिय काव्यप्रकार १५. वृक्ष १६. विनाविलंब, लगेच १८. कौतुक, स्तुती १९. शेराचा चौथा भाग २१. अंतःपूर, जनानखाना २३. वसूल न झालेले कर्ज २४. हात गमावलेला २६. त्रिफळा चूर्णातील एक घटक २८. लष्कर, सैन्य ३०. प्रश्न, समस्या ३२. यज्ञातून जन्मलेली, द्रौपदी ३४. व्रत, धार्मिक नेम ३६. ओसाड जमिनीवर किंवा पिकात वाढणारे तण ४०. व्यवस्थित ४१. अचानक झालेली इच्छा ४२. बुब्बुळाचा एक रोग ४३. वडील, पिता ४५. निर्णय ४७. परिधान करणे, गुहेतले शिल्प ४८. नमस्कार, प्रणाम ४९. लहान मुलीची कर्णफुले ५१. दानव, राक्षस ५२. जीत, सरशी ५३. वनस्पतीचे चिवट तंतू ५४. श्रीपाद, संन्यासी ५६. नुकसान ५८. अल्प ५९. पडदा, हृदयातील झडप ६०. पंचविशी ते पन्नाशीपर्यंत हिंदू पुरुषाचा 'आश्रम', प्रपंच ६३. दुधाचे पक्वान्न ६४. विनाशकारी ६५. बरोबर, संगे ६६. प्रणाम ६७. एकत्र येणे ६८. हिंमत, बिशाद ७०. संवत्सर ७१. डेप्युटी, दुय्यम ७२. श्री शंकराचे प्रसिद्ध स्तोत्र ७४. विनोदी किस्सा ७६. निष्पाप, निरागस ७७. दरवाजा, कवाड ७८. झाडाभोवतीचा पार, गप्पा मारायची जागा ७९. गार पाण्यासाठी मातीचे भांडे ८१. चांदी, रौप्य ८२. भाऊ-बहीण ८६. व्यापारी ८७. पारितोषिक, पुरस्कार ८८. माफी ९०. सतरावे नक्षत्र ९१. स्मरणी ९४. रोगप्रतिबंधक औषध ९६. बाहेरून फुगलेला व आतून पोकळ ९७. मक्षिका ९८. तुंबळ युद्ध ९९. महिना १००. युद्धाची जागा, युद्धभूमी १०२. वायू, हनुमानाचे वडील १०३. वर्ष, साल १०४. करून खडबडीत मोठे आंबटगोड फळ १०५. पदोन्नती

**उभे शब्द –** १. अस्वस्थपणे मागेपुढे चालत राहणे २. मवाली, समाजकंटक ३. विहिरीतून पाणी काढण्याचे भांडे ४. ज्याप्रमाणे ५. वस्ती, कॉलनी ६. ऐश्वर्य, विश्व ७. शिंपल्यात राहणारा प्राणी ८. विष १०. गुंडांनी धमकावून बळकावलेले धन ११. दिवस १२. नाविक, नाव वल्हवणारा १४. काम करण्याचा उरक किंवा वेग १६. पळून गेलेला १७. हुप्प्या, वानर २०. उंची व महाग कुर्ता २२. भावजय २३. पाखरांना भिववण्यासाठी शेतात उभारलेली बाहुली २५. अंगावर काटे असलेला प्राणी २७. संधी हिरावून घेणे, वंचित करणे २९. लबाडी ३१. कृतक, खोटा, वरवरचा ३३. महिला कर्मचारी ३५. स्वच्छ ३७. वजनदार ३७अ. उन्हाळ्यात सर्वत्र आढळणारी उसाच्या रसाची दुकाने ३८. भार, बोजा ३९. शरीर, देह ४४. एक अप्रिय चव, स्वाद ४५. नेहमी, नियमित ४६. लचांड, भानगड ४७. कारकून ५०. एक लाख ५१. दुर्दशा, दुरवस्था ५३. राबता, नियमित उठबस ५५. ऋषीचे घर ५७. अजिबात, बिलकुल (नाही) ५८. महान ५९. उग्र, प्रखर ६१. स्टेशन, गाड्या थांबण्याची जागा ६२. पंजा व हाताला जोडणारे ६३. अडथळा ६४. शेंडीभोवतीचा घेरा ६७. खुंटी ६८. पांडवांचा राजवाडा ६९. मळलेले, घाणेरडे ७०. शंभर ७१. घोड्याच्या पायाला ठोकलेला पत्रा ७२. मस्तक ७३. हरीण ७४. बिडी ७५. कर्दळीचे झाड, गोव्यातली प्रसिद्ध देवी ७६. तुलनेवर आधारित, तारतम्यानुसार ठरवलेले ७७. खट्याळ, खोडकर ७८. पुराणातील एक ऋषी, हा ब्रह्मदेवाचा नातू होता ८०. ठळक, नजरेत स्पष्ट भरणारे ८३. पूज्य, वंदनीय ८४. शिस्त ८५. सामान्य, साधारण ८६. काळी तुळस ८७. ताकद ८९. रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी गायला जाणारा राग ९०. उपमर्द ९२. मंजूर, कबूल ९३. जंगल, रान ९५. घर ९७. हनुमान १०१. उचित, योग्य १०२. कळी, अंकुर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. खाकरा ३. कमकुवत ७. साहजिक १०. चिबूड ११. सुटका १२. हावभाव १४. घन १५. हस्तक १६. पण १७. भुईकोट १८. सारीपाट २०. टवाळ २२. खुरपे २४. कावा २६. रवाना २७. भला २८. कान ३०. उभय ३१. द्विपदी ३२. अवयव ३४. पुटकुळी ३५. रस ३७. सुज्ञ ३८. चाल ३९. घेणे ४०. रत ४२. वारू ४३. उच्छाद ४५. किळसवाणे ४८. चक्रवाढ ५०. गुर्मी ५१. मदत ५३. हलकल्लोळ ५४. महा ५५. उदात्त ५६. इमारत ५७. कपटी ५८. कानवला ६१. जव ६३. खालसा ६४. मलीन ६५. खस ६७. हाक ६९. चीज ७०. मगध ७२. खाजण ७४. जनावर ७६. गाकर ७७. गीतारहस्य ७९. तर ८०. गाजर ८१. दुर्वा ८२. वश ८६. पांचाली ८७. जाणता ८९. तमालपत्र ९१. पोटगी ९३. प्रभा ९४. प्रभा ९५. गत ९७. नग ९८. आप ९९. दादा १००. कमावता १०२. गजवदन १०४. मसनद १०५. फाकडा १०६. क्रय

**उभे शब्द :** १. खाबूगिरी २. कड ३. कटकट ४. मका ५. वहाण ६. तव ७. साव ८. जिराईत ९. ऊन ११. सुस्त १३. भास्कर १४. घटका भरणे १५. हटवादी १६. पळ १८. साध्य १९. पारपत्र २१. वास्तव २२. खुला २३. पेकाट २५. वायस २७. भव २९. नकुल सहदेव ३२. अज्ञ ३३. यदृच्छा ३४. पुलकित ३६. परचक्र ३७. सुरू ३९. घेणेकरी ४१. तक्र ४२. वाढ ४३. उर्मी ४४. दमदाटी ४६. वाल ४७. दळणवळण ४९. वारेमाप ५०. गुहा ५२. दत्त ५४. मत ५५. उपसागर ५७. कलम करणे ५८. कालीमाता ५९. नन ६०. लाख ६२. जहाज ६३. सखा ६८. कनात ६९. चीर ७१. दहशत ७३. जग ७५. वरपांगी ७६. गाज ७७. गीर्वाण ७८. रव ८०. गालीप्रदान ८१. दुजाभाव ८३. अलगद ८४. चित्रल ८५. आपोआप ८८. ताग ९०. मानवता ९२. टप ९४. प्रमाद ९६. तगडा ९९. दास १०१. ताफा १०३. नक्र

# अवकाळी पावसाचे दोन बळी

पान १ वरून

ऐन हिवाळ्यात आलेल्या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागाला बसला आहे. पाऊस आणि थंडीने दोन जणांचा बळी घेतला आहे. शिर्डीत उदरनिर्वाहासाठी आलेल्या दोन जणांचे मृतदेह रस्त्याच्या कडेला आढळुन आले. गेल्या दोन दिवसापासुन शिर्डीत कोसळत असलेला पाऊस आणि गारठ्यामुळे या दोन्ही व्यक्तींचा मृत्यू झाला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिर्डीतील नगर - मनमाड महामार्गावर एक आणि कणकुरी रोडवर लागत असलेल्या ओढ्याजवळ दोन ठिकाणी दोन जणांचे मृतदेह आढळून आले. याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर घटनास्थळी जात दोन्ही मृतदेहांचा पंचनामा केला. यातील एका मृत व्यक्तीजवळ काही कागदपत्र आढळून आली. कागदपत्रांवरच्या माहितीनुसार एकनाथ हाटे असं या मृत व्यक्तीचं नाव असून तो ठाणे जिल्ह्यातील कल्याण इथं राहणारा आहे. एकनाथ हाटे यांच्याकडे असलेल्या कागदपत्रावरून त्यांचा कुटूंबियांना संपर्क साधण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत. तर दुसरा व्यक्ती हा शिर्डीत भिक्षेकरु म्हणुन राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

बळीराजाला पुन्हा एकदा निसर्गाने फटका दिल्याने शेतकरी वर्ग पुरता हतबल झाला आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा प्रशासनाने तातडीने पंचनामा करून शेतकरी आणि त्या पशुपालकांना नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी केली जात आहे. अवकाळी पावसाचा राज्यातील पिकांना मोठा फटका बसला यावर प्रतिक्रिया देताना कृषी मंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे की, सध्या कागदावर नुकसानीची माहिती विमा कंपन्यांना दिली तरी ग्राह्य धरलं जाणार आहे. नाशिकमध्ये रात्रभर सुरू असलेल्या पावसात भिजल्यामुळे थंडीत गारठून शंभर पेक्षा जास्त मेंढ्याचा मृत्यू झाल्याची घटना बागलाणच्या अंबासन भागात घडली. काही मेंढपाळ या भागात मेंढ्या घेऊन आले होते त्यांनी अंबासन भागात शेतात मुक्काम केला होता. मात्र रात्री मुसळधार पाऊस झाला पावसात भिजल्यामुळे थंडीत गारठून मेंढ्या दगावल्या त्यामुळे ४ ते ५ मेंढपाळ शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून वाचलेल्या मेंढ्याना शेकोटी पेटवून वाचविण्याचा प्रयत्न मेंढपाळ करीत आहे. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील नांदुर आणि खंदरमाळ परिसरात घडला आहे. वातावरणात वाढलेल्या गारठ्यामुळे एका मेंढपाळाच्या तब्बल २० मेंढ्यांचा मृत्यू झाला आहे तर कोकरेही आता अखेरच्या घटका मोजत आहेत. जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील नांदुर आणि खंदरमाळ परिसरात विसावा घेतलेल्या मेंढपाळाच्या बाबतीत ही दुर्दैवी घटना घडलेली आहे. यामध्ये मेंढपाळाचे लाखोंचे नुकसान झाले आहे. पुसेगाव - खटाव परिसरात बुधवारी रात्रभर झालेल्या पावसाने मेघलदरेवाडी (ता. खटाव) येथील मेंढपाळ कुमार बाबा मदने यांच्या लहान मोठ्या अशा एकूण १५ शेळ्या व मेंढ्या थंडीने गारठून जागीच मरण पावल्या.

सांगलीत ऊसतोड मजुरांचा संसार पाण्यात गेला असून पावसामुळे विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. समडोळी गावात मजुरांच्या झोपड्यात पाणी शिरलं असून संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झालं आहे. उदरनिर्वाह चालवण्यासाठी पर जिल्ह्यातून आलेल्या मजुरांच्यावर आता अस्मानी संकट कोसळलं आहे. मजुरांचा संसार पाण्यावर तरंगत असून उरलं सुरलेलं साहित्य ते बाहेर काढत आहेत. कोल्हापुरातील अवकाळी पावसामुळे ऊस शिवारात पाणी शिरल्यानं शेतकऱ्याचं नुकसान झाले आहे. तोडणी खोळंबली असल्यानं साखर कारखान्याचा हंगाम अडचणीत आला आहे. ऊस पुरेसा मिळत नसल्यामुळे साखर कारखाना काही काळासाठी बंद ठेवावा लागणार आहे त्यामुळे दररोज साखर कारखान्याचंही नुकसान होतं आहे.

साताऱ्यात पावसाचा फटका आता महाबळेश्वरमधील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. महाबळेश्वर, जावळी, भिलार या ठिकाणी झालेल्या पावसामुळे हातात आलेलं स्ट्रॉबेरीचं पिक वाया गेलं आहे. शेतात पाणी साचून राहिल्यामुळे शेतकऱ्यांना उरली सुरली स्ट्रॉबेरी कुजून जाईल अशी भिती आहे.अनेक शेतकऱ्यांच्या शेतात स्ट्रॉबेरीची फळे खराब झाली आहेत. ज्यामुळे अनेक शेतकऱ्यांचं लाखांच्या घरात आर्थिक नुकसान होणार आहे. थंड वातावरणामुळे महाबळेश्वर आणि नजिकच्या पट्ट्यांत स्ट्रॉबेरीचं उत्पादन घेतलं जातं. महाबळेश्वरमध्ये २ हजार हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवर स्ट्रॉबेरीचं पिक घेतलं जातं. या भागातील शेतकऱ्यांच्या मुख्य उत्पन्नाचा स्रोत स्ट्रॉबेरी असल्यामुळे आता या शेतकऱ्यांसमोर मोठं संकट निर्माण झालं आहे. महाबळेश्वरमध्ये उत्पादीत झालेली स्ट्रॉबेरी ही बहुतांश प्रमाणात निर्यात केली जाते. या स्ट्रॉबेरीला २०० ते ३०० रुपये किलो असा दरही मिळतो. परंतु यंदा पावसामुळे हातातोंडाशी आलेलं पिक वाया गेल्यामुळे शेतकरी चांगलाच संकटात सापडला आहे. अनेक फळांमध्ये आताच किड लागल्यामुळे स्थानिक बाजारातही हे उत्पादन घेऊन जाण्याचा काहीच फायदा नसल्याची हतबल प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली. दरम्यान वाई तालुक्यात भिरडाची वाडी गावात रात्रभर सुरु असलेल्या पावसामुळे शिवाजी धायगुडे या मेंढपाळाच्या २० बकऱ्या मृत्युमुखी पडल्या आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, नंदुरबार जिल्ह्यात शेतपिकं, फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. कांदा, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याला या पावसामुळे चिंतेत आहेत. सातारा शहर आणि महाबळेश्वरमध्येही अवकाळी पावसानं हजेरी लावलीय. त्यामुळे स्ट्रॉबेरीचं पीक धोक्यात आलं. तिकडे कोकणातील रत्नागिरीतल्या चिपळूण, गुहागर, खेड, दापोलीतही सरी बरसल्या. त्यामुळे आंबा आणि काजू पीक संकटात सापडले आहे. राज्यात पुढील दोन ते तीन दिवस पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळ शेतकरी पुन्हा एकदा चिंतेत सापडलाय. हा पाऊस काही पिकांना नुकसान पोहोचवणारा असला, तरी पश्चिम महाराष्ट्रातील नुकत्याच पेरण्या झालेल्या रब्बी पिंकासाठी समानधानकारक असल्याचं शेतकरी बोलत आहेत.

## कामगारांसाठी जाहीर सूचना/नोटीस

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, **श्री. जाफरुल्ला खान, (वरिष्ठ अध्यक्ष, मानव संसाधन), मे. एफ.डि.सी.लि., सिटीएस नं. ६७६, सी-१२, दालिया इंड. इस्टेट, वि.रा. देसाई रोड, अंधेरी, पश्चिम, मुंबई** - ४०० ०५८. या जागेचे क्षेत्रफळ **२७१०.००** चौ.मी. सदर जागेवर पूर्वी मे.मेटालॉइस लि., ही आस्थापना कार्यरत होती. सदर आस्थापना सतत तोटा होत असल्यामुळे दि.**३१.०५.१९८९** रोजी बंद झाली व कामगारांना त्यांची कायदेशीर देयदेणी देण्यात आली.

तरी देखील **मे. एफ.डि.सी.लि., सिटीएस नं. ६७६, सी-१२, दालिया इंड. इस्टेट, वि.रा. देसाई रोड, अंधेरी, पश्चिम, मुंबई** - ४०० ०५८. या जागेवर पूर्वी मे.मेटालॉइस लि., ही आस्थापना कार्यरत होती. या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुध्द असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पश्चिम) यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०० ०५१ यांच्याकडे जाहीर नोटीस/सुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

स्थळ- मुंबई
दिनांक-०३.१२.२०२१

सही/-
**मे. एफ.डि.सी.लि.,**
**(वरिष्ठ अध्यक्ष, मानव संसाधन)**

BYP

# वेंगुर्ल्यातील रेडी खाण प्रकल्पाविरोधात गावकरी

पान १ वरून - मायनिंग उत्खनन होत आहे. काही कंपन्यांनी सीआरझेड कायद्याचा भंगही केला आहे. कंपन्यांनी मायनिंग उत्खनन केल्यानंतर मोठमोठाले खड्डे तसेच ठेवले. कोट्यवधी रुपयांचे मायनिंग उत्खनन करूनही शेवटी कोणत्याही यंत्रणेने खड्डे बुजविण्यास कंपन्यांना भाग पाडले नाही. सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यात कायदेशीर व बेकायदेशीर मार्गाने उत्खनन होणाऱ्या मायनिंगचे डंपर रेडी पोर्टकडे येत असल्याने लोकांना धुळीचा त्रास होत आहे. रेडी बंदरावर मायनिंग माती नेली जाते. नंतर ही माती जहाजातून चीनला रवाना केली जाते. शासनाला रॉयल्टी मिळत असते. त्यातून शासनाने गावाच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची गरज असूनही तसे झाले नाही, अशा लोकांच्या तक्रारी आहेत.विहिरींच्या पाण्याची पातली खाली गेली आहे. विहिरीना प्रदूषित पाणी येत आहे. ते पाणी पिण्यालायक नाही. धुळीमुळे श्वसनाचे आणि त्वचेचे रोग होत आहे. शेती, बागायती उत्पन्नात घात झाली आहे. मच्छीमारीवर ही त्याचा परिणाम झाला आहे.पूर्वीच्या डेक्कन मिनरल्स व न्यू इंडिया मायनिंग कॉर्पोरेशनचे खाण मालक संदीप श्रीवास्तव यांच्या मेटल ॲन्ड प्रा. ली. ने नव्या प्रकल्पासाठी परवानगी मागितली आहे. मायनिंग कंपन्या व दलाली करणाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची माया गोळा केली आहे.रेडी गाव मायनिंगमुळे आरोग्याला धोकादायक बनला आहे. त्यासाठी लोकांनी एकत्रित येऊन सरकारी यंत्रणेला जागे करायचे ठरविले आहे.

# परमबीर सिंह अखेर पोलीस सेवेतून निलंबित

पान १ वरून

राज्यातील गृह विभागाने त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी लावली होती. अनिल देशमुख यांच्यावर परमबीर सिंह यांनी केलेला शंभर कोटींच्या खंडणीचा आरोप आणि त्यांच्या विरोधात मुंबईतील गोरेगाव आणि ठाणे येथे दाखल झालेले दोन खंडणीचे गुन्हे, तसेच न्यायालय न्यायालयाने वारंवार समन्स पाठवूनही परमबीर सिंह चौकशीला हजर राहत नव्हते. तसेच ते कुठे आहेत याचीही कुणाला माहिती नव्हती. अखेर पोलिसांनी त्यांच्या अटकेसाठी न्यायालयात अर्ज केला. तो न्यायालयाने स्वीकारून त्यांना पोलिसांसमोर हजर होण्याची मुदत दिली. तसेच त्या मुदतीत हजर्र न झाल्यास संपती जप्त करण्याचे आदेश दिले. त्यानंतर परमबीर सिंह यांच्या वकिलाने परमबीर देशाबाहेर पळून गेलेले नाहीत तर देशातच असून त्यांना महाराष्ट्र पोलिसांकडून धोका असल्याने ते हजर होऊ शकले नाहीत, असे म्हटले होते. मात्र आता ते न्यायालयात अथवा सीबी आय समोर हजर होऊ शकतात अशी माहिती न्यायालयात दिली होती.

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

म्हाडा MHADA

## निविदा सूचना

### उप जिल्हानिबंधक / मुंबई जिल्हा (शहर) यांचेकडे नोंदणीकृत मजुर सहकारी संस्थांसाठी

कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३, यांनी खाली दर्शविलेल्या कामांकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे उप जिल्हानिबंधक/ मुंबई उपनगरे जिल्हा (शहर) यांचेकडे नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था / सोसायटी कडुन योग्य त्या प्रणालीसाठी ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत

| ई-निविदा क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | मजूर सहकारी संस्था नोंदणी वर्गवारी | निविदा रक्कम (१२% GST) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पीएमजीपी इमारती वृंदावन नं. (बल्लाळेश्वर) मुंबई ई-१ विभाग या इमारतीच्या अंतर्गत प्लास्टर व रंगरंगोटीचे काम करणे | ११,९२,०६१/- | १२०००.०० | वर्ग ब व त्यावरिल | ५९०.०० | १५ महिने पावसाळ्यासहीत |
| २ | विशेष दुरुस्ती अंतर्गत गावदेवी या पुनर्रचित इमारतीतील ई-१ विभाग या इमारतीचे बाहेरील स्ट्रक्चरल दुरुस्तीचे व रंगरंगोटीचे काम करणे | २६,०६,३५७/- | २७०००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १८ महिने पावसाळ्यासहीत |
| ३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत राजा दशरथ, मुंबई या पुनर्रचित इमारतीतील ई-१ विभाग या इमारतीचे बाहेरील व अंतर्गत स्ट्रक्चरल दुरुस्तीचे व रंगरंगोटीचे काम करणे | २४,३६,३१४/- | २५०००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १८ महिने पावसाळ्यासहीत |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत द्वारकामाई, मुंबई या पुनर्रचित इमारतीतील ई-१ विभाग या इमारतीचे बाहेरील स्ट्रक्चरल दुरुस्तीचे काम करणे | २९,९४,५५३/- | ३००००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १८ महिने पावसाळ्यासहीत |

| अ. क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | जाहिरात दिनांक | ०३/१२/२०२१,१०:०० |
| २ | निविदा विक्री सुरू | ०३/१२/२०२१,१०:०५ |
| ३ | निविदा विक्री बंद | १५/१२/२०२१,१७:३० |
| ४ | निविदा स्विकृती सुरू | ०३/१२/२०२१,१०:०५ |
| ५ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | १५/१२/२०२१, १७.३५ |
| ६ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १७/१२/२०२१, ११.०० |
| ७ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | १८/१२/२०२१, ११.०० |

१) संपूर्ण निविदा पद्धती ही ऑनलाईन स्वरुपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सूचना, अटी व शर्थी **http://mahatenders.gov.in** व म्हाडाच्या **MHADA Website - http://mhada.gov.in** या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केल्या जातील.
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि.०३/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०५ नंतर ते १५/१२/२०२१ सायंकाळी ५.३५ वाजेपर्यंत **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) उपरोक्त कामांची तांत्रिक बोली दिनांक १७/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. नंतर व आर्थिक बोली दिनांक १८/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. नंतर कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र.३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ येथे उघडण्यात येतील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघडण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोली मध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉर्मेटमध्ये तांत्रिक बोलीच्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग II / III मान्यताप्राप्त प्राधिकरणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पू.मंडळ, यांचेकडे (निविदा स्विकृती अधिकाऱ्यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) निविदाकारांना शासन निर्णय क्र. **सीएटी-०१/२०१५/प्र.क.२०/इमा-२, दि.२४/०४/२०१५** मधील अटी व शर्ती लागू राहतील.
१०) निविदाकारांनी जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करावे.
११) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अमानत रक्कम निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अमानत बाबत सविस्तर सुचना पहावी.
१२) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सूचना **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येतील. मदतीसाठी : १८००-३०७०-२२३२ **Mail - eproc. support@maharashtra.gov.in**

**म्हाडा** - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सीपीआरओ/ए/४४३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता ई-१ विभाग,**
**मुं.इ.दु. व पू.मंडळ**

# मुख्यमंत्री वर्षावर परतले! आदित्य ड्रायव्हिंग सीटवर



**मुंबई -** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना गुरुवारी सकाळी सर एच एन रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असल्याची माहिती रुग्णालयाचे डॉक्टर अजित देसाई यांनी अधिकृतरित्या दिली आहे. मुख्यमंत्र्यांना डिस्चार्ज दिला, त्यावेळी त्यांचा मोठा मुलगा आणि पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे स्वत: ड्रायव्हिंग करत असल्याचे समजते. पुढील काही दिवस मुख्यमंत्र्यांना घरूनच काम करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. दरम्यान, मानेच्या दुखण्यामुळे मुख्यमंरी उद्धव ठाकरे मुंबईतील एच. एन. रिलायन्स रुग्णालयात दाखल झाले होते. आधी वरिष्ठ आर्थो सर्जन डॉक्टरांच्या सल्ल्याने विविध वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या होत्या.या चाचण्यांचे रिपोर्ट आल्यानंतर वरिष्ठ डॉक्टर मुख्यमंत्री ठाकरे यांच्याशी चर्चा झाली. त्यानंतर मानेच्या दुखण्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ते १० नोव्हेंबरला रुग्णालयात दाखल झाले होते.

## भाजप आरोग्य समिती सदस्य राजीनामा नायर रुग्णालय! वरळी सिलिंडर स्फोट प्रकरण

■ मुंबई

**नायर** रुग्णालय प्रशासन आणि डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे; वरळी मतदार संघामधील बीडीडी चाळीतील सिलिंडर स्फोटात भाजलेल्या चिमुकल्यावर तब्बल तासभर कोणताही उपचार न केल्यामुळे त्याचा दुर्दैवी अंत झाला. याप्रकरणी रुग्णालय प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या निषेधार्थ भाजपा सार्वजनिक आरोग्य समितीच्या सर्व सदस्यांनी राजीनामा दिला.

**पीडित कुटुंबीयांना २५ लाख द्या**

गुरुवारी मुंबई भाजपाचे अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, आ. योगेश सागर, आ. अमित साटम, गटनेते प्रभाकर शिंदे, विनोद मिश्रा आणि नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. रमेश भारमल यांची भेट घेऊन झालेल्या दुर्दैवी प्रकाराची सविस्तर माहिती घेतली. यावेळी रुग्णालयातील वरिष्ठ पान ५ वर

### पेंग्विनवर उधळपट्टी जनता वाऱ्यावर

मुंबई महापालिका आरोग्य यंत्रणेवर दरवर्षी ४५०० कोटी रुपये खर्च करते. त्यानंतरही नायर रुग्णालय प्रशासन/ डॉक्टरांचा निष्काळजीपणा, हलगर्जीपणा व दुर्लक्षामुळे सुरुवातीच्या ४५ मिनिटांत डॉक्टरांनी उपचार न केल्यामुळे एका दुर्दैवी चिमुकल्याचा अंत होणे ही अतिशय शरमेची बाब आहे. एकीकडे केवळ युवराजांच्या हट्टापोटी भारतीय प्राणी, पक्षी सोडून परदेशी पेंग्विनवर दररोज रु.१.५ लाख रुपये खर्च करण्याच्या सत्ताधारी पक्षाला या बालमृत्यूचे सोयरसुतक नाही ही बाब तमाम पान ५ वर

## २२ व्या दिवशीही एसटी कामगारांचा संप सुरूच

■ मुंबई

**विलगीकरणाच्या** मागणीवरुन राज्यातील एसटी कामगारांचा २२ दिवशीही संप सुरुच होता.अनेक डेपोतील गाड्या अद्याप प्रवाशांसाठी बाहेर निघाल्याच नाही. तसेच आझाद मैदानातील संपकरी कर्मचाऱ्यांनी आपला ठिय्या कायम ठेवत विलगीकरणाच्या मागणीवर ठाम राहिले आणि सरकारविरोधी दोरदार घोषणा दिल्या, हा संप अद्याप कायम असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. या संपात चोपडा आगाराचे कर्मचारी सहभागी झाले आहे. राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांची मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधींसोबत आज बैठक घेत आहे. परंतु त्या संघटनेचे प्रतिनिधींनी संपाला पाठिंबा दिला नाही. त्यांच्यासोबत परिवहन मंत्री यांनी बैठक घेणे आम्हाला मान्य नाही. काही निर्णय घ्यायचा असेल तर परबांनी ॲड. सदावर्ते व गुजर साहेब यांच्याशी चर्चा करून निर्णय घ्यावा, असे चोपडा आगाराचे संपकरी कर्मचाऱ्यांनी मागणी केली आहे.

## आर्यन खान प्रकरणातील साक्षीदार गोसावी केळवे पोलिसांच्या ताब्यात

■ पालघर

**अभिनेता** शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानच्या ड्रग्ज प्रकरणातील वादग्रस्त साक्षीदार किरण गोसावी याला केळवे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पालघर तालुक्यातील एडवण येथील दोन तरुणांना परदेशात नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांची लुबाडणूक केल्याप्रकरणी गोसावी विरोधात केळवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यानंतर केळवे पोलिसांनी रात्री उशिरा किरण गोसावी याला ताब्यात घेतले आहे

पालघर तालुक्यातील एडवण या गावातील दोन तरुणांची त्याने दोन वर्षांपूर्वी



फसवणूक केली होती. या दोघांना मलेशिया येथे कामाला लावतो,असे सांगून त्यांच्याकडून दीड लाख रुपये गोसावीने उकळले. हे दोन तरुण दोन-तीन वर्षांपूर्वी नोकरीच्या शोधात असताना किरण गोसावीची त्यांच्याशी सुरुवातीला फेसबुकवरून मैत्री झाली.या दोघांना मलेशियाला कामाला लावतो, असे सांगितल्यानंतर दोघांकडून गोसावीने दीड लाख रुपयांची मागणी केली. त्यानुसार दोघांनीही गोसावीच्या के.पी. इंटरप्राईज या बँक खात्यात पैसे दिले. त्यानंतर त्याने दोघांनाही विमानाचे तिकीट व व्हीजा दिला. मात्र कोचीन विमानतळावर पोहोचल्यावर विमानाचे तिकीट व व्हीजा बोगस असल्याचे समजले.

## कोल्हापूरचे काँग्रेस आमदार चंद्रकांत जाधव यांचे निधन

**कोल्हापूर -** कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे आमदार चंद्रकांत जाधव यांचे आज पहाटे हैदराबादमधील रुग्णालयात निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून आजारी असलेल्या जाधव यांच्यावर हैदराबादच्या रुग्णालयात उपचार सुरू होते. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत ते पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आले होते. कोल्हापूरमधील काँग्रेसचे आमदार चंद्रकांत जाधव यांना यापूर्वी दोनदा कोरोनाची लागण झाली होती.



त्यावर त्यांनी मात केली होती. परंतु गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यामुळे त्यांना उपचारासाठी हैदराबादमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचार सुरु असताना आज त्यांचे निधन झाले. जाधव राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते. कोल्हापूर शहरातील अनेक तालीम मंडळांची फुटबॉलच्या माध्यमातून त्यांचा थेट संपर्क होता. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी माजी आमदार राजेश क्षीरसागर यांचा पराभव करून विजय मिळवला होता.

## अकाली दलाचे मनजिंदर सिंग सिरसा यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली -** शिरोमणी अकाली दलाचे नेते आणि दिल्ली शीख गुरूद्वारा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनजिंदर सिंग सिरसा यांनी बुधवारी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान



आणि गजेंद्र सिंह शेखावत यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. पुढील वर्षी पंजाबमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपला हे मोठे यश मिळाले आहे.

शिरोमणी अकाली दलाचे नेते सिरसा यांनी बुधवारी गुरुद्वारा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर अकाली दल सोडल्याची घोषणा केली. नंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पंजाब विधानसभा निवडणुकीतील भाजपचे प्रभारी गजेंद्र सिंह शेखावत आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. सिरसा यांच्या भाजप प्रवेशामुळे येथे पक्षाला बळकटी मिळाली असून एक प्रमुख चेहरा मिळाला आहे, असे मत शेखावत यांनी व्यक्त केले. तीन कृषी कायद्यांमुळे अडचणीत आलेल्या भाजपने अलीकडेच हे कायदे रद्द केले. त्यानंतर पक्षाला मिळालेले हे मोठे यश आहे, असे त्यांनी सांगितले.

## गुजरातचे मुख्यमंत्री मुंबईत आशिष शेलार गप्प का?

**मुंबई -** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी मुंबईत आल्या आणि त्यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांची भेट घेतली. या भेटीवर आक्षेप घेत टीका करीत भाजपा नेते आशिष शेलार म्हणाले की, त्या इकडे येऊन महाराष्ट्रातील उद्योग त्यांच्या राज्यात घेऊन जातील. मग इथल्या लोकांनी वडापाव विकत बसावे अशी शिवसेनेची इच्छा आहे का? मात्र आशिष शेलार यांनी टीका करून एक दिवस जात नाही तोच गुजरातचे भाजपाचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल मुंबईत दाखल झाले आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल हे मुंबईत दाखल झाले असून महाराष्ट्रातील उद्योगकांशी काल त्यांनी भेटीगाठी घेऊन चर्चा केली. टाटा व इतर समूहांनी गुजरातमध्ये उद्योग आणावे अशी विनंती केली. यावर मात्र भाजपा नेते आशिष शेलार काहीच का बोलत नाहीत? असा सवाल विचारला जात आहे.

## म्हाडाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा आमदार अजय चौधरी यांच्या प्रयत्नांना यश

■ मुंबई

**मुंबईतील** उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडा) च्या इमारतींचा पुनर्विकास या मुंबईकरांच्या महत्त्वाच्या प्रश्नी शिवडी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अजय चौधरी हे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. चौधरी यांच्या प्रयत्नांना यश आले असून नुकत्याच पार पडलेल्या नगरविकास आणि गृहखात्याच्या संयुक्त सभेमध्ये या ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या इमारतींमध्ये राहणाऱ्या जवळपास २८ हजारांहून अधिक सदनिकाधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईतील म्हाडाच्या या ३८८ इमारतींची परिस्थिती अत्यंत गंभीर स्वरुपाची झाली असून या इमारतींच्या देखभालीकरिता म्हाडाचा मोठा निधी खर्च होतो आहे. येथील रहिवासी इमारतींच्या प्रतिक्षेत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार अजय चौधरी यांनी मुख्यमंत्र्यांना लेखी निवेदन सादर केले होते. त्या अनुशंगाने नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी एका संयुक्त बैठकीचे आयोजन मागील आठवड्यात केले होते. पुनर्विकासाच्या या प्रश्नी चौधरी यांनी मुंबईकरांची बाजू लावून धरली. पुनर्विकासाच्या कलमामध्ये आवश्यक बदल करून त्याची नवीन अधिसूचना काढण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिल्याने आता या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या बैठकीस म्हाडा सभापती विनोद घोसाळकर, गृहनिर्माण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम करण्यास कटिबद्ध असल्याची भावना आमदार अजय चौधरी यांनी 'नवाकाळ'शी बोलताना व्यक्त केली.

## पंतप्रधान फंडातील ६० टक्के व्हेंटिलेटर सुरूच झाले नाहीत

■ नवी दिल्ली

**शिवसेनेचे** खासदार विनायक राऊत यांनी आज लोकसभेत बोलताना म्हटले की, पी एम केअर फंडातून पुरवले गेलेले ६० टक्के व्हेंटिलेटर बंद आहेत. खासदार विनायक राऊत म्हणाले की, कोरोनाची स्थिती गंभीर असताना पीएम केअर फंडातून व्हेंटिलेटर पुरवले गेले. पण हे व्हेंटिलेटर सुरु



करण्यासाठी तंत्रज्ञ येणे आवश्यक होते. पण ते आलेच नाहीत.ज्या एजन्सीला काम दिले होते, त्यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही त्यांनी तंत्रज्ञ पाठवले नाहीत. त्यामुळे ६० टक्के व्हेंटिलेटर बंदच राहिले. एजन्सीला मात्र पूर्ण मोबदला मिळाला.यासाठी त्या एजन्सीची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

## देशांतर्गत विमान प्रवाशांच्या आरटीपीसीआरचा आदेश मागे घेणार

■ मुंबई

**परराज्यातून** महाराष्ट्रात येणाऱ्या विमान प्रवाशांना आरटी-पीसीआर टेस्ट बंधनकारक करण्यात आली आहे, असा अध्यादेश ३० तारखेला राज्य सरकारकडून काढण्यात आला होता. पण देशांतर्गत विमान प्रवास करताना आरटी-पीसीआर नको असे केंद्राचे आदेश आहेत. त्यामुळे मुख्यसचिव, मुख्यमंत्र्याकडून आरोग्य विभागाकडून राज्य सरकारने काढलेला आदेश मागे घेण्याची विनंती केली होती. ही विनंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मान्य केली असून आजच हा आदेश मागे घेतला जाणार असल्याची माहिती राजेश टोपे यांनी दिली आहे. ते जालन्यात बोलत होते. सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पराज्यातून येणाऱ्यांसाठी आरटी-पीसीआर निगेटिव्ह अहवाल बंधनकारक असल्याचे जाहीर केले होते. त्यांच्या घोषणेमुळे उलट सुलट चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यानंतर हा आदेश मागे घेण्यात येणार असल्याचे टोपेंनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, रिसकी असलेल्या ११ देशातून आलेल्या प्रवाशांसाठी आल्या बरोबर आरटी-पीसीआर चाचणी बंधनकारक असून ७ दिवस क्वारंटाईन बंधनकारक आहे. त्यांनतर ७ दिवस होम क्वारंटाईन बंधनकारक असून ८ व्या दिवशी पुन्हा आरटी-पीसीआर बंधनकारक आहे असंही टोपे यांनी स्पष्ट केले.




## शक्ती कायदा याच हिवाळी अधिवेशनात मंजूर करून घेणार

■ मुंबई

**महिला** आणि लहान मुलांवरील अत्याचार रोखण्यासाठी तेलंगणातील दिशा कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात शक्ती कायदा करण्याच्या हालचालींना वेग आला असून या बाबतचे विधेयक याच हिवाळी अधिवेशनात मंजूर करून घेतले जाणार आहे. महिला आणि लहान मुलांवरील अत्याचारांच्या तक्रारीवर प्रभावीपणे कारवाई करता यावी यासाठी प्रस्तावित कायद्याची चौकात अधिक बळकट करणे गरजेचे होते महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ कायदा २०२० आणि स्पेशल करतकोर्ट अँड मिशनरीफोर इंप्लीमेंटेन्षणऑफ महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ २०२० अशी दोन विधेयक विधी मंडळासमोर मांडण्यात येणार आहे. त्यासाठी अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखालील उपसमिती नेमण्यात आली होती. त्यात एकनाथ शिंदे, जयंत पाटील, यशोमती ठाकूर आणि वर्षा गायकवाड या मंत्र्यांचा समावेश आहे. या समितीच्या अनेक बैठका होऊन या कायद्यातील तरतुदींबाबत सविस्तर चर्चा करून तसेच विधी विभागाचा सल्ला घेऊन विधेयक तयार करण्यात आली आहे. त्याला यापूर्वीच मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. आता हे विधेयक याच हिवाळी अधिवेशनात मंजूर करून घेतले जाईल. या प्रस्तावित कायद्यात पिडीतांना न्याय देण्याबाबत अनेक महत्वाच्या तरतुदी आहेत.

## जवाद चक्रीवादळामुळे रेल्वेच्या ९५ मेल व एक्सप्रेस ट्रेन रद्द

**नवी दिल्ली -** बंगालच्या खाडीत निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे तयार झालेले जवाद चक्रीवादळ ओडिशा आणि उत्तर आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकणार आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून भारतीय रेल्वेने ३ आणि ४ डिसेंबरला ९५ मेल आणि एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या आहेत. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे निर्माण झालेले जवाद चक्रीवादळ ओडिशा आणि आंध्र प्रदेशकडे सरकत आहे. त्यामुळे या भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे या भागातील रेल्वेच्या गाड्या रद्द करण्याचा निर्णय भारतीय रेल्वेने घेतला आहे.

## नाशिकमध्ये नगरपंचायत निवडणूक उमेदवारी अर्ज मुदत ७ डिसेंबरपर्यंत

**२१ डिसेंबरला मतदान**

नाशिक - नाशिक जिल्ह्यातील निफाड, देवळा, पेठ, सुरगाणा आणि कळवण या ५ नगरपंचायतींची निवडणूक २१ डिसेंबरला होणार आहे. त्यासाठी आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ७ डिसेंबर आहे. ८ डिसेंबरला अर्जांची छाननी केली जाणार असून १३ डिसेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. नाशिक जिल्ह्यातील ५ नगरपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या निवडणुकांची आचारसंहिता २४ नोव्हेंबरपासून लागू झाली आहे. या ५ नगरपंचायतीच्या प्रत्येकी १७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यासाठी २१ डिसेंबरला मतदान घेण्यात येणार असून २२ डिसेंबरला मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहेत. कोरोनाचे नियम पाळून ही निवडणूक घेण्यात येणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रचारात मास्क, सुरक्षित अंतर आणि लसीकरण यावर भर दिला जाणार आहे.


## चाळीसगाच्या हिरापूरजवळ क्रूझर उलटून अपघात

**जळगाव -** चाळीसगाव तालुक्यातील हिरापूर गावाजवळ बुधवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास क्रूझर जीप उलटून अपघात झाला. त्यात नाना भास्कर कोळी, विकास जलाल तडवी, मुक्तार तडवी हे ३ मजूर जागीच ठार झाले तर इतर ६ जण जबर जखमी झाले. उपचारासाठी चाळीसगावमधील सरकारी आणि खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले

**३ ठार, ६ जखमी**

आहे. मनमाडला गेलेल्या १४ मजुरांना घेऊन जीप चाळीसगावकडे परतत होती. बुधवारी रात्री १० वा. ती चाळीसगाव-नांदगाव रोडवरील हिरापूर गावाजवळ आली. पावसामुळे ओल्या झालेल्या रस्त्यावरून घरून उलटली. त्यात ३ मजुरांचा जागीच मृत्यू झाला. विनोस तडवी (३५), चंदन हरीश पाटील (२७), माधान नारायण पाटील (३०), नितीन बाळू पाटील (२६), दिलीप शब्बीर तडवी (३५), समीर राजू तडवी (२३) आणि स्वप्नील पाटील व इतर यात जबर जखमी झाले.

**पंधरावा स्मृतिदिन**



**कै.अरविंद नारायण चुरी**

देवाज्ञा : ३ डिसेंबर २००६

**तुमच्या आत्म्यास शांती लाभो!**

**ही ईश्वरचरणी प्रार्थना**
**समस्त चुरी परिवार**

## घटस्फोटानंतर मुलं सज्ञान होईपर्यंत पालन-पोषणाची जबाबदारी वडिलांचीच

■ नवी दिल्ली

**पती-पत्नीमध्ये** वाद होणं ही सामान्य बाब आहे. मात्र अनेकदा निर्णय घ्यावा लागतो. कित्येक वेळा या वादांची परिणती घटस्फोटामध्ये होते. या वादाचा परिणाम मुलांच्या जडणघडणीवर होऊ न देणं गरजेचं असतं. यानंतर मुलांची जबाबदारी कोणाची हा प्रश्नही उपस्थित होतो. मात्र सर्वोच्च न्यायालयाने आता यावर स्पष्टीकरण दिले आहे. पती-पत्नीमध्ये वाद असतील, तर मुले सज्ञान होईपर्यंत त्यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी वडिलांचीच असते, अशी स्पष्टोक्ती सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. न्यायमूर्ती एम.आर. शाह आणि न्यायमूर्ती



ए. एस. बोपण्णा यांनी बुधवारी दिलेल्या एका निकालात याबाबत मत मांडलं. या प्रकरणातल्या जोडप्याचा विवाह १६ नोव्हेंबर २००५ रोजी झाला होता. तसेच, २०११च्या मे महिन्यापासून हे पती-पत्नी एकमेकांपासून वेगळे राहत आहेत. त्यांचा घटस्फोट झाल्यानंतर १५ नोव्हेंबर २०१२ रोजी लष्कराच्या अधिकाऱ्यांनी पतीला असे निर्देश दिले होते, की

**■ सर्वोच्च न्यायालयाने दिला निकाल**

त्याने मुलाच्या पालन पोषणासाठी दरमहा ५० हजार रुपये द्यावेत. लग्नाच्या वेळी पती लष्करात मेजर पदावर कार्यरत होता. २०१९च्या डिसेंबरपासून मुलाच्या वडिलांनी मुलाच्या पोषणासाठीची रक्कम देणं बंद केलं होतं.

## काशी विश्वनाथ धाम लोकार्पण पंतप्रधानांचे २५ हजार साधूंना निमंत्रण

■ वाराणसी

**उत्तर प्रदेश** राज्यातील जगप्रसिद्ध काशी विश्वनाथ धामचा लोकार्पण सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या १३ डिसेंबर रोजी मोठ्या थाटात पार पडणार आहे.त्यासाठी देशभरातील २५ हजार साधूंना खास निमंत्रण दिले असून त्यांचे भक्तही यावेळी उपस्थित राहणार आहेत. मंदिर परिसरातील तब्बल ५ लाख चौरस फूट जागेवर विस्तारीकरण प्रकल्प राबविला असून त्यात एकाच वेळी ७५ हजार भाविक एकत्र येऊ शकतील. या नवीन प्रकल्पाच्या माध्यमातून आता भाविकांना गंगा नदीचे पवित्र जल घेऊन काशी विश्वेश्वरास अभिषेक करता येणार आहे.या प्रकल्पाचा शिलान्यास ८ मार्च २०१९ रोजी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पार पडला होता. त्यासाठी सुमारे ८०० कोटी रुपये खर्च झाला आहे.वास्तू विशारद विमल पटेल यांनी या प्रकल्पाचा आराखडा बनविला आहे.त्यात भव्य गर्भगृह,चार प्रवेशद्वारे, प्रसादालय,सत्संग सभागृह आणि वृद्धाश्रम बांधण्यात आला आहे.तसेच सरकते जिने,घाट परिसरात शौचालय,सामान ठेवण्यासाठी लोकर्स सुविधांही उपलब्ध आहे.या मंदिराच्या विस्तारीकरण प्रकल्पासाठी परिसरातील ३१४ घरे आणि इमारती संबंधितांना सहमतीने दुप्पट बाजार भाव किंमत देऊन सरकारने ताब्यात घेतली आहे.तसेच १४०० दुकानदार,फेरीवाले यांना भरपाई देऊन पर्यायी जागाही दिली आहे.

